महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ३८, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १७ डिसेंबर २०२४ ते सोमवार २३ डिसेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळाबाबतचे २० महत्त्वाचे मुद्दे

# मंत्रिमंडळात एकूण ४२ मंत्री, २० नवे चेहरे, चार महिला व सहा राज्यमंत्री



■ मुंबई : विशाल कारंडे

विधानसभा निवडणूक निकालानंतर तीन आठवड्यांनी राज्य मंत्रिमंडळाचा बहुचर्चित विस्तार झाला. देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळात विविध जातीजमातीची समीकरण साधताना तिन्ही पक्षांनी ज्येष्ठ नेत्यांना धक्का दिला. छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह काही ज्येष्ठ मंत्र्यांना घरचा रस्ता दाखविण्यात आला असून ३९ जणांपैकी २० नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली. नागपूरमधील राजभवनाच्या प्रांगणात राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ३३ कॅबिनेट मंत्री आणि सहा राज्यमंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांचा आधीच शपथविधी झाला होता. हे तीन व नवे ३९ असे एकत्रित मंत्रिमंडळाचे आकारमान ४२ इतके झाले आहे. कायद्यानुसार ४३ मंत्रिपदांची तरतूद असल्याने एक मंत्रिपद रिक्त ठेवण्यात आले आहे. हे मंत्रिपद कोणासाठी रिक्त ठेवण्यात आले याची नंतर कुजबुज सुरू झाली. फडणवीसांच्या मंत्रिमंडळात मराठा, ओबीसी, आदिवासी, धनगर, अनुसूचित जाती, अल्पसंख्याक, बिगर मराठी अशा सर्व जातीजमातींचा समतोल राखण्यात आला आहे. याशिवाय विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, उत्तर महाराष्ट्र असा विभागीय समतोल राखण्यात आला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड. आशीष शेलार, गणेश नाईक, राधाकृष्ण विखे-पाटील, पंकजा मुंडे, अतुल सावे, शिवसेनेचे उदय सामंत, दादा भुसे, शंभूराज देसाई तर राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे, नरहरी झिरवळ, आदिती तटकरे, अनिल पाटील आदींना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे.

**फडणवीसांच्या मंत्रिमंडळाबाबतचे २० महत्त्वाचे मुद्दे**

१. नव्या मंत्रिमंडळात एकूण चार महिला मंत्री आहेत. यामध्ये पंकजा मुंडे, माधुरी मिसाळ, आदिती तटकरे, मेघना बोर्डीकर यांचा समावेश आहे.

२. ३३ कॅबिनेट मंत्र्यांचा व सहा राज्यमंत्र्यांचा शपथिधी झाला

३. फडणवीसांच्या मंत्रिमंडळात एकूण ४२ मंत्री आहेत

४. मंत्रिमंडळात भाजपाने नऊ नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

५. शिवसेनेने सहा, तर राष्ट्रवादी काँग्रेसने पाच नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे.

६. फडणवीसांच्या मंत्रिमंडळात भाजपाचे १७ कॅबिनेट मंत्री व तीन राज्यमंत्री आहेत

७. शिवसेनेचे १० कॅबिनेट व दोन राज्यमंत्री आहेत.

८. राष्ट्रवादीचे आठ कॅबिनेट व एक राज्यमंत्री आहेत.

९. सातारा जिल्ह्याला सर्वाधिक मंत्रीपदं मिळाली आहेत. साताऱ्यात चार कॅबिनेट मंत्री आहेत. (शेष पृष्ठ ३ वर)

## संक्षिप्त

### तबल्याचे सूर शांत झाले, उस्ताद झाकीर हुसैन यांचे निधन

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

प्रसिद्ध तबलावादक झाकीर हुसैन यांनी वयाच्या ७३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. अमेरिकेतील रुग्णालयात झाकीर हुसैन यांच्यावर उपचार सुरु होते. झाकीर हुसैन यांना हृदयविकाराचा त्रास होता. त्यासाठी त्यांना अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण अखेरीस




त्यांची झुंज अपयशी ठरली आणि झाकीर हुसैन यांची प्राणज्योत मालवली. मागील वर्षापासून झाकीर हुसैन यांना हृदयविकाराचा त्रास होत होता. त्यावर ते उपचारही घेत होते. काही वेळापूर्वी त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली होती. पण आता तबल्याचे हे सूर शांत झालेत. उत्साद झाकीर हुसैन यांनी जगाचा निरोप घेतला आहे. त्याच्या निधनाच्या बातमीने भारतीय संगीतविश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांना भारत सरकारने १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण, २०२३ मध्ये पद्माविभूषण यासारख्या सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. झाकीर हुसैन यांना १९९० मध्ये संगीत नाटक अकादमीचा सर्वोच्च संगीत पुरस्कारही मिळाला होता. २००९ मध्ये ५१ व्या ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उस्ताद झाकीर हुसैन यांना त्यांच्या कारकिर्दीत ७ वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते, त्यापैकी त्यांना हा पुरस्कार चार वेळा मिळाला होता.

### नेरुळ, घणसोलीतील बेकायदा बांधकामांवर कारवाई; महापालिकेच्या नोटिशीकडे दुर्लक्ष करून बांधकामे

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने नोटीस देऊनही संबंधितांनी दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात पालिका अतिक्रमण विभागामार्फत नेरुळ व घणसोली विभागांत पाडकाम कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरुळ कार्यक्षेत्राअंर्तगत असलेल्या अनधिकृत बांधकाम




धारक रामचंद्र बाळाराम ठाकूर घर क्र. १०५, नेरुळ गाव या इमारतीचे पाडकाम करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी नेरुळ विभागाचे सहाय्यक आयुक्त तसेच अतिक्रमण विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे समवेत सुरक्षारक्षक, स्थानिक पोलीस तैनात होते. त्याचप्रमाणे घणसोली विभाग कार्यालयामार्फत राजु सातपुते (घरमालक व विकासक) यांनी सर्व्हे नं. २०/३०,से.२२ तळवली गांव, घणसोली येथे पालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता इमारतीचे बांधकाम सुरू केले होते.

## देश सव्वा वर्षात नक्षलवादमुक्तः केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचा निर्धार

■ रायपूर : वृत्तसंस्था

''छत्तीसगडमधून नक्षलवादाचे ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्णपणे उच्चाटन करण्यास केंद्र सरकार आणि छत्तीसगड राज्य सरकार कटिबद्ध आहे,'' असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी केले. छत्तीसगड नक्षलवादाच्या धोक्यापासून मुक्त झाले, तर पूर्ण देश या धोक्यापासून मुक्त होईल, असेही ते म्हणाले. रायपूरमध्ये राष्ट्रपतींच्या पोलिस पुरस्कार कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या एका वर्षात छत्तीसगड पोलिसांनी नक्षलवादाविरुद्ध लढण्यामध्ये मोठी उपलब्धी गाठली आहे, असे ते म्हणाले. तसेच, छत्तीसगड सरकारच्या नक्षलवाद्यांसाठीच्या पुनर्वसन धोरणाचीही त्यांनी स्तुती केली. नक्षलवाद्यांना



हिंसा सोडून मुख्य प्रवाहात येण्याचेही आवाहन त्यांनी केले. 'गेल्या वर्षभरात छत्तीसगडमध्ये २८७ नक्षलवादी ठार करण्यात आले. सुमारे एक हजार नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली आणि ८३७ नक्षलवादी शरण आले,' असे सांगून अमित शहा यांनी पोलिसांचे कौतुक केले. शहा यांनी या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली वाहिली.

छत्तीसगडचे मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी नक्षलवाद्याच्या धोक्यापासून राज्य मुक्त करण्याची प्रतिज्ञा केली आहे. केंद्र सरकारही त्यांच्या या प्रतिज्ञेची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध आहे. आपण मिळून नक्षलवादाचा धोका ३१ मार्च २०२६ पूर्वी संपवू. छत्तीसगड नक्षलवादमुक्त झाले, तर पूर्ण देश या धोक्यापासून मुक्त होईल.

## 'पोलीस व्यवस्थेने बळी घेतला', सोमनाथ सूर्यवंशीच्या कोठडीतील मृत्यूनंतर जितेंद्र आव्हाडांचे गंभीर आरोप

■ मुंबई : गणेश बागडे

परभणी येथे १० डिसेंबर रोजी हिंसाचार झाला होता. त्यानंतर या प्रकरणी परभणी पोलिसांनी अटक केलेल्या ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा रविवारी परभणी जिल्हा कारागृहात न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. परभणी रेल्वे स्थानकाबाहेर भारतीय राज्यघटनेच्या प्रतिकृतीची कथित विटंबना केल्यानंतर झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर परभणी पोलिसांनी अटक केलेल्या ५० जणांपैकी मृत सोमनाथ सूर्यवंशी एक होता. दरम्यान सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाच्या कोठडीतील मृत्यूनंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. सोमनाथ सूर्यवंशीचा पोलीस व्यवस्थेने बळी घेतल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे. सोमनाथ सूर्यवंशी याच्या मृत्यूनंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एक्सवर पोस्ट लिहली आहे. त्यामध्ये आमदार आव्हाड म्हणाले की, 'परभणी येथील आंबेडकरी आंदोलक असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा



पोलीस व्यवस्थेने बळी घेतला. कायद्याचे शिक्षण घेणारा हा तरुण 'न्यायालयीन कोठडीत' असताना मरण पावतो, ही अजूनच गंभीर बाब आहे. तो मेला का त्याला मारण्यात आले, हे पोस्टमार्टम झाल्यावर समजेलष्ठपण एक समाज म्हणून आपल्या समोर तोच प्रश्न पुन्हा पुन्हा उभा राहतोष्ठअसे अजून किती सोमनाथ आपला जीव गमावणार आहेत..?' १० डिसेंबर रोजी सोपान पवार या व्यक्तीने संविधानाच्या प्रतिकृतीची कथितपणे विटंबना केली होती, त्यानंतर दुसऱ्या दिवशी निदर्शने आणि दगडफेक झाली. परभणी पोलिसांनी एफआयआर नोंदवून सोमनाथ सूर्यवंशी याच्यासह ५० जणांना अटक केली होती. सूर्यवशीला १२ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली आणि १४ डिसेंबर रोजी न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले. त्यानंतर छातीत दुखू लागल्याने त्याला स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले होते, असे पोलिसांनी सांगितले.

(शेष पृष्ठ ३ वर)

## भूसंपादनाविरोधात शेतकऱ्यांची एकजूट; उरण, पनवेलमधील १२४ गावे संपादित करण्याची अधिसूचना

■ उरणः सुचिता देशमुख

एमएमआरडीएच्या तिसऱ्या मुंबईसाठी उरण, पनवेल व पेण मधील १२४ गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादनाचा निर्णय शासनाने घेतला आहे. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता हा निर्णय घेण्यात आल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर पुन्हा भूसंपदानाविरोधात एकवटण्याचे आवाहन एमएमआरडीएविरोधी समितीने एका निवेदनाद्वारे ग्रामस्थांना केले आहे. मार्च महिन्यात कोकण भवन येथील कोकण नगररचना विभागाकडे शेतकऱ्यांनी भूसंपादनाविरोधात २५ हजार हरकती व सूचना नोंदविल्या होत्या. मात्र या संदर्भात शासनाने कोणत्याही



प्रकारची सुनावणी घेतली नाही. निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आदल्या दिवशी एमएमआरडीएची नवनगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली. शासनाचा हा निर्णय भांडवलदार आणि विकासकांच्या फायद्यासाठी असल्याचा शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. यामुळे येथील शेतकरी आक्रमक झाले आहेत. आचारसंहिता संपताच मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला होता. या पार्श्वभूमीवर गावोगावी बैठकीचे नियोजन करण्याचे आवाहन एमएमआरडीएविरोधी शेतकरी संघर्ष समितीचे नेते सुधाकर पाटील यांनी केले आहे. राज्य सरकारने एमएमआरडीएला तिसरी मुंबई विकसित करण्यासाठी नवनगर विकास प्राधिकरण (एनटीडीए) म्हणून नियुक्ती केल्याची अधिसूचना जाहीर केली आहे. यात उरण तालुक्यातील २९,पनवेल मधील – ७ तर पेण मधील ८८ अशा एकूण १२४ गावातील ३३२ चौरस किलोमीटर क्षेत्रावर हे नवे शहर उभारण्यात येणार आहे. या शहराला मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर कर्नाळा- साई – चिरनेर(केएससी) संकुल या नावाने ओळखले जाणार आहे. यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार आहेत.

## मुंबईला जोडणारा वाशी पुल लवकरच होणार खुला

■ मुंबई : यश सावंत

वाहनधारकांना नव्या वर्षात महाराष्ट्र राज्य रस्ते विकासमंडळ नवं गिफ्ट देणार आहे. मुंबईला जोडणारा ठाणे खाडी पुलाचं काम पूर्णत्वावर आलाय. या पुलाला वाशीचा पूल देखील म्हणूनही ओळखलं जातं. हा पूल नव्या वर्षातील फेब्रुवारी महिन्यात वाहतुकीसाठी खुला होणार असल्याची



शक्यता आहे. विशेष दोन महिन्यापूर्वीच म्हणजे १३ ऑक्टोबर रोजी या प्रकल्पाचा नवी मुंबईला जाणारा भाग वाहनधारकांसाठी खुला झाला होता. वाशी पुलावरील रहदारी कमी करण्यासाठी हा पूल महत्त्वाचा आहे. वाशी पूल वाहतुकीसाठी महत्त्वाचा असून या पुलावरून दर दिवसाला वाशी ते मुंबई दरम्यान साधारण ६४,३०० वाहनांची ये-जा होते. त्यामुळेच हा पूल वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या पुलाला मुंबईला जोडणारा चौथा क्रिक ब्रिज म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नवीन पूल बांधला असून तो खाडीवर पसरलेला आहे. अधिक रहदारीचा मार्ग कमी करण्यासाठी हा पूल राज्याचा दीर्घकालीन योजनेचा एक महत्त्वाचा भाग आहे. खाडीवर दोन पूल आधीपासून आहेत. हा पूल १९७३ मध्ये बांधण्यात आला असून यात दोन लेन आहेत. जी सुरक्षेच्या कारणास्तव सुमारे दोन दशकांपासून हा पूल नियमित रहदारीसाठी बंद आहे. मात्र हा पूल कधीकधी बॉलिवूड चित्रपटांमध्ये मुंबईच्या पार्श्वभूमीचा भाग म्हणून दाखवला जातो.

(शेष पृष्ठ ३ वर)

## विमानतळाची धावपट्टी सज्ज; नवी मुंबई विमानतळावर प्राधिकरणाकडून आणखी एक यशस्वी चाचणी

■ नवी मुंबई : प्रतिनिधी


नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान तळाच्या दक्षिण धावपट्टीवर वैमानिकांना विमान उतरविण्यावेळी धावपट्टीचा अचूक अंदाज मिळण्यासाठी धावपट्टीवरील दिव्यांच्या मार्गाची अचूक सूचना देणाऱ्या यंत्रणेची चाचणी एका लहान विमानाच्या साह्याने गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाल्याची माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने (एनएमआयए) गुरुवारी




सायंकाळी त्यांच्या समाजमाध्यमांवरील संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. ही चाचणी यशस्वी झाल्याने विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर लवकरच मोठे विमान उतरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या सहकार्याने गुरुवारी सकाळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवरील ०८/२६ येथे चाचणी घेण्यात आली. गुरुवारी सकाळी तब्बल दोन तास धावपट्टीवर लहान विमान चाचणीसाठी घिरट्या घालत होते. विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील (शेष पृष्ठ ३ वर)

पाहिजेत
ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे.
पात्रता : १२ वी / मराठी भाषा व कॉम्प्युटर चे ज्ञान असणे आवश्यक.
पत्ता : जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बांद्रा (पूर्व)
संपर्क : ०२२ ३१८०८५०९ / ९८०४३८६७४८ / ९८९२३८६७४८




# वाढदिवसाच्या शुभेच्छा की दिलजमाईचा प्रस्ताव?

सिंगापूरमध्ये गुरूवारी रंगलेल्या बुद्धिबळ जगज्जेतेपदाच्या अंतिम लढतीत चीनच्या डिंग लिरेनविरुद्ध थरारक विजय मिळवत भारताचा दोम्माराजू गुकेश विश्वविजेता ठरला. डी. गुकेशवर सध्या जगभरातील क्रीडा रसिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. एका बाजूला जागतिक बुद्धिबळ अजिंक्य स्पर्धेत अवघ्या १८ वर्षांचा डी. गुकेश दोन वेळचा विश्वविजेता आणि बुद्धिबळ या क्रीडाप्रकार मुरलेल्या डिंग लिरेनला मात देत असताना त्याच दिवशी देशाच्या राजकीय पटलावरही काही चाली खेळल्या जात होत्या.

महाराष्ट्रापासून हजारो किमी लांब असलेल्या दिल्लीत बसून महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणावर पकड असलेले काही जुने जाणते खेळाडू राजकारणातील एका बुजूर्ग खेळाडूला नव्या चालींनी कोंडीत पकडण्याचा आटोकाट प्रयत्न करत असल्याचे चित्र दिसत होते. एरवी पडद्यामागून राजकीय समीकरणे जुळवणारे हे राजकारणपटू कधी नव्हे ते एका कार्यक्रमानिमित्ताने एकमेकांसमोर आल्याने राजकीय नेत्यांसह सर्वसामान्यांच्याही भुवया उंचावल्या. या भेटीगाठींचे अर्थातच दिल्लीसह महाराष्ट्रातील राजकारणावर पडसाद उमटू लागले आहेत. गुरुवारी दिल्लीत झालेल्या शरद पवार-अजित पवार-अमित शहा यांच्या भेटीत नव्या धक्कातंत्राचे संकेत मिळू लागले आहेत.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नवी दिल्लीतील ६जनपथ येथील निवासस्थानी आपला ८४ वा वाढदिवस साजरा केला. वाढदिवसानिमित्त पवारांच्या शासकीय निवासस्थानी एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पक्षाचे खासदार, नेते, पदाधिकारी, मोजके कुटुंबीय, निकटवर्तीयदेखील उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत शरद पवारांनी आपल्या सहकाऱ्यांनी अत्यंत प्रेमाने हाती दिलेल्या तलवारीने एकामागोमाग अनेक केक कापत आपला वाढदिवस साजरा केला. सध्या संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यामुळे राज्यसभेचे सदस्य असलेले शरद पवार आणि त्यांच्या पक्षाचे इतर खासदारही दिल्लीत असणे स्वाभाविकच होते. पण याच वेळी शरद पवार यांचे पुतणे म्हणजेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारदेखील सहकुटुंब दिल्लीत उपस्थित होते, याला निव्वळ राजकीय योगायोग म्हणता येईल. दिल्लीची हवा, कल्चर मला मानवत नाही, असे अजित पवार कधीकाळी म्हणायचे. परंतु महायुतीत सहभागी झाल्यापासून शरद पवारांहून जास्त दिल्लीवाऱ्या अजित पवारांच्याच सुरू आहेत. लोकसभा-विधानसभा निवडणुकीआधी अधिकाधिक जागा पदरात पाडून घेण्यासाठी अजित पवार भाजपश्रेष्ठ ींशी चर्चा करण्यासाठी पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंसोबत दिल्लीत यायचे. निवडणुकीपूर्वी ते एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिल्लीला जात असत. अजित पवारांनी आपल्या संसदीय कारकिर्दीची सुरूवातच लोकसभेचे सदस्य या नात्याने सुरू केली होती. त्यामुळे हळूहळू का होईना, परंतु अजित पवारांना दिल्लीची हवा मानवू लागली आहे. परंतु लवकरच दिल्लीची हवा त्यांच्या अंगीही लागेल. कारण अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांना नुकतेच ११ जनपथ इथे टाईप ८ प्रकारातील सरकारी निवासस्थान मिळाले आहे. हे निवासस्थान शरद पवार यांच्या निवासस्थाच्या एकदम नजीक आहे. जेथे शरद पवार आपली कन्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासोबत राहतात.

सुनेत्रा पवार यांचे निवासस्थान पाहण्यासाठी तसेच भाजपश्रेष्ठींच्या भेटीगाठींसाठी मागील दोन दिवसांपासून अजितदादा दिल्लीतच होते. त्यातच शरद पवारांचा वाढदिवस असल्याने हाती आलेला उत्तम योग साधून त्यांनी सहकुटुंब शरद पवारांची भेट घेतली. शरद पवार कधीकाळी दिल्ली आणि महाराष्ट्रातील महत्त्वाची कामे ज्या नेत्यांवर अतिशय विश्वासाने सोपवायचे ते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ आणि सुनील तटकरे आदी सहकारीही यावेळी अजितदादांसोबत होते. अजितदादांच्या पाठोपाठ केंद्रीय गृहमंत्री अमित शहादेखील शुभेच्छा देण्याच्या निमित्ताने शरद पवारांच्या निवासस्थानी पोहोचले. या सगळ्यांचेच सुप्रिया सुळे यांनी अतिशय प्रेमपूर्वक आगतस्वागत केले. पवार काका-पुतण्या आणि पवार-शहा यांच्यात मोठ्या कालावधीनंतर झालेली ही पहिलीच खुलेआम भेट म्हणावी लागेल. या बड्या नेत्यांच्या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, त्याचा तपशील समजू शकला नसला, तरी या भेटीगाठीनंतर दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मिलनाच्या कहाण्या राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. एवढेच नाही, तर दोन्ही गटांतील नेते, खासदार, आमदारही बेकी सोडून एकीच्या बाता मारू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत १० पैकी ८ जागा जिंकून शरद पवार गटाने जबरदस्त स्ट्राईक रेट ठेवला होता. मात्र विधानसभेत त्यांना अवघ्या १० जागांवर समाधान मानावे लागले आहे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही, हे राजकीय सत्य जाणणारा शरद पवारांपेक्षा दुसरा नेता नाही. राजकीय स्वार्थ्यापोटी कधी सत्तेत राहून, तर कधी सत्तेला बाहेरून पाठिंबा देणारे शरद पवार सगळ्यांनीच पाहिलेत. पुढची ५ वर्षे सत्तेशिवाय काढणे उरल्यासुरल्या शरद पवार गटासाठी कठीणच बाब आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रात गृहमंत्रीपदासाठी अडून बसलेल्या एकनाथ शिंदेंना किती काळ सहन करायचे हादेखील भाजपपुढील कळीचा मुद्दा असणार आहे. त्यावर उतारा म्हणून राष्ट्रवादीचे दोन्ही गट सत्तेत आल्यास भाजप-राष्ट्रवादीच्या जोडीने बहुमताचा पेच सहज सुटण्यासारखा दिसतो. एकमेकांची राजकीय अपरिहार्यता म्हणा वा वाढदिवसाच्या शुभेच्छांच्या माध्यमातून राजकीय सुप्त इच्छा म्हणा, दोन्ही गटांकडून पडद्यामागून काहीतरी हालचाली सुरू असल्याचे संकेत नक्कीच मिळत आहेत.

# जगा आणि जगू द्या... सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला!

**दोन-तीन दिवसांपासून अतुल सुभाष हे नाव सातत्याने चर्चेत आहे. पत्नी आणि तिच्या माहेरच्यांवर मानसिक त्रासाचा आरोप करत अतुल सुभाष या बेंगळुरूतील इंजिनीअरने ९ डिसेंबर रोजी आत्महत्या केली. जवळपास दीड तासाचा व्हिडीओ आणि २४ पानांची सुसाईड नोट लिहून अतुलने आत्महत्या केली. आयुष्य संपवण्याएवढे टोकाचे पाऊल उचलण्यासाठी पत्नी निकिता सिंघानिया आणि तिचा परिवार जबाबदार असल्याचे त्याने म्हटले आहे. तेव्हापासूनच हुंडाबळी कायदा, घरगुती हिंसाचार आणि घटस्फोट यांसारख्या कायद्यांच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. यासोबतच कायदा नेहमीच महिलांना झुकतं माप देतो, त्यावर पुनर्विचार व्हावा, अशीदेखील मागणी होऊ लागली आहे. विशेष म्हणजे अतुल सुभाष प्रकरणानंतर अशाच एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने थेट 'जगा आणि जगू द्या' असा सल्ला दिला आहे.**

भारतात विवाहाला पवित्र बंधन मानले जाते. विवाहानंतर स्त्रिया आपल्या वडिलांचे घर सोडून पतीच्या घरी जातात, परंतु तिथे गेल्यावर अनेकदा त्यांना छळाला सामोरे जावे लागते. विवाहित स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या या बातम्या आपण नेहमी ऐकतो. विविध कारणांसाठी त्यांचा होणारा छळ, मारहाण अशा गोष्टी आपल्यासाठी नवीन नाहीत. कधी कधी तर हा त्रास इतका टोकाला जातो की महिलेला जीव गमवावा लागतो, तर अनेकदा सासरच्या छळाला कंटाळून अनेक महिला आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचलतात. हे सगळे टळावे आणि स्त्रियांना सन्मानानं जगता यावे यासाठी त्यांना कायद्याने काही अधिकार देण्यात आले आहेत आणि अशा वेळी जर त्यांच्या हक्कांची कुणी पायमल्ली करत असेल, तर या महिला कायद्याचा आधार घेऊ शकतात.

महिला आणि कायदा हे तसे नेहमीचेच समीकरण. कोणताही कायदा हा कायम महिलांची पाठराखण करत असतो, असं नेहमीच म्हटलं जातं, पण अतुल सुभाष प्रकरणानंतर मात्र महिला कायद्याचा गैरवापर कशा करतात, सगळे कायदे स्वत:च्या सोयीने कसे वाकवून घेतात यावरच मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा नेहमीचाच प्रश्न समोर आला आहे की महिला खरंच त्यांच्यासाठी असलेल्या कायद्याचा गैरवापर करतात का? त्याआधी आपण अतुल सुभाष प्रकरणासारख्या अन्य प्रकरणांचा आढावा घेऊ आणि अशा अनेक प्रकरणांत वेळोवेळी न्यायालयाकडून काय निरीक्षणे नोंदवली गेली तेदेखील पाहू.

हुंडाबळीच्या कायद्यातील तरतुदींचा 'असंतुष्ट पत्नींकडून' ढाल म्हणून वापर न करता केवळ शस्त्र म्हणून दुरुपयोग केला जात असल्याचे निरीक्षण झारखंड उच्च न्यायालयाने काही काळापूर्वी नोंदवले होते. सासरच्या मंडळींकडून विवाहित महिलेचा छळ होत असेल तर '४९८ अ' अर्थात हुंडाबळी कायद्यान्वये तिला त्यापासून संरक्षण मिळवता येते. यासंदर्भातीलच एका प्रकरणाच्या सुनावणीवेळी झारखंड उच्च न्यायायालयाचे न्या. संजय कुमार द्विवेदी यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले. पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून महिलेला क्रूर वागणूक मिळाल्यास त्यांना शिक्षा देण्याच्या सद्हेतूने कलम ४९८ अ कायद्यात समाविष्ट केले गेले. अलीकडच्या वर्षांत वैवाहिक वादांमध्ये अभूतपूर्व वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळेच भादंविच्या कलम ४९८ अ चा अनेक प्रकरणांमध्ये गैरवापर होत आहे, असे वाटत असल्याचे निरीक्षण खुद्द न्यायालयानेच नोंदवले आहे.

दोन वेगळ्या परिवारातील माणसे एकत्र येणार म्हणजे वाद, कुरबुरी होणार हे गृहीतच असते, मात्र हे लहान-मोठे वैवाहिक संघर्ष अचानक सुरू होऊन एकदमच गंभीर होतात. ते इतके वाढतात की त्याची परिणती एखाद्याच्या मृत्यूतही होते. हे गुन्हे खूप गंभीर आहेत. त्यामुळे अशा प्रकरणात नीट विचार करून तटस्थपणे मार्ग काढायला हवा, असेही न्यायालयाने म्हटले होते. तसेच योग्य सल्लामसलत





न करता केवळ आवेशात येऊन किरकोळ मुद्यांवर महिलांकडून असे खटले दाखल केले जात असल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली होती.

अन्य एक-दोन प्रकरणांतही न्यायालयाने महिलांकडून कायद्याचा गैरवापर होताना दिसतो, अशाच आशयाचे निरीक्षण नोंदवले होते. पुरुषांकडून किंवा सासरच्यांकडून होणाऱ्या अशा या आरोपांमध्ये खरंच काही तथ्य आहे का, यासाठी कौटुंबिक न्यायालयातील महिला वकिलांशी संपर्क साधला. गेली जवळपास २० वर्षे कौटुंबिक न्यायालयात कार्यरत असलेल्या ॲड. सरस्वती कदम म्हणतात की, महिला कायद्याचा गैरवापर करतात. ४९८ (ए) अर्थात हुंडाबळी, घरगुती हिंसाचार तसेच पोटगी असे अनेक पर्याय महिलांकडे उपलब्ध आहेत आणि अनेकदा त्याचा वापर त्या करून घेतात. अनेकदा घटस्फोटासाठी केस फाईल केलेली असते, मात्र ही सगळी कायदेशीर प्रक्रिया लवकर आटपावी यासाठी महिलांकडून दबाव टाकण्याचे प्रयत्न केले जातात. मग ते खोट्या केसेस टाकणे असो किंवा मग जास्तीचे पैसे मागणे असो. सगळ्याच महिला अशा असतात असे नाही, पण अशा महिलांचे प्रमाण नोंद घ्यावी इतके आहे, हेदेखील त्या आवर्जून सांगतात. खरंतर हा सगळा प्रश्न नवरा-बायको आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या इगोचा असतो. या इगोपायीच अनेकदा समोरच्या पार्टीवर दबावतंत्राचा वापर केला जातो. ॲड. कदम एक खूप चांगला मुद्दा मांडतात. त्या म्हणतात की, कोर्टात केस दाखल झाली रे झाली की नवरा करोडपती होतो तर बायको गरीब होते आणि जरी बायको कमावती असली तरी नवऱ्याने आपल्या भविष्याची संपूर्ण तरतूद करणे हे नवऱ्याचे कर्तव्यच आहे अशाच समजुतीत या बायका असतात आणि त्यातूनच मग त्या नवऱ्यावर, सासरच्यांवर दबाव टाकायला सुरुवात करतात. अनेकदा यात त्यांच्या घरच्यांचादेखील महत्त्वाचा वाटा असतो, तर त्याही पलीकडे जाऊन बायका आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सासरच्यांची बदनामी करताना दिसतात. त्यामुळे अनेकदा आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी महिलांकडून कायद्याचा गैरवापर होतो हे वास्तव आहे, पण म्हणून सगळ्याच महिला तशा असतात असे नाही. अनेक महिला यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत असल्याचेदेखील त्या सांगतात आणि ज्यांना नात्यातून खरंच मोकळीक हवी असेल, त्या महिला अजिबात अशा कोणत्याही गोष्टीत अडकत नाहीत, तर आपल्याला जे साध्य करायचे आहे त्याच दृष्टीने प्रयत्न करतात.

यासोबतच या कायद्याच्या अंमलबजावणीची दुसरी बाजूदेखील महत्त्वाची असल्याचे ॲड. कदम सांगतात. म्हणजेच कायदा स्त्रियांच्या बाजूने आहे, असे जरी आपण म्हणत असलो तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान हे कुठेच दिसत नाही. कारण घटस्फोट होतो, पत्नीला पोटगी देण्याचा निकालही दिला जातो, पण प्रत्यक्षात ती पोटगी पत्नीपर्यंत पोहचण्यात कधी कधी जवळपास वर्षभराचादेखील कालावधी उलटून जातो. अनेकदा घरगुती हिंसाचाराची तक्रार करण्यासाठी महिला जेव्हा पोलीस ठाण्यात जातात, तेव्हा आजही त्यांची तक्रार गेल्या गेल्या दाखल करून घेतली जात नाही. घरातलीच भांडणं आहेत ना मग त्यात काय, अशी विचारणा त्यांनाच केली जाते. थोडक्यात काय तर कायदा आहे हे जरी असले तरी अशा या अनेक गोष्टी आहेत, ज्याचा विचार केला जाणे महत्त्वाचे आणि अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेकदा अशा छोट्या छोट्या गोष्टीच मोठ्या घटनांमध्ये रूपांतरित होताना दिसतात. त्यामुळे कायदे जरी महिलांच्या संरक्षणासाठी केले जात असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर त्यात अनेक त्रुटी आहेत आणि त्यावर तोडगा काढणे अत्यंत गरजेचे आहे. अतुल सुभाष प्रकरणाचा विचार केला तर याच प्रकरणाच्या आधारे नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने पोटगीसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यासाठी निकषदेखील ठरवून दिले आहेत, मात्र हे सगळं मार्गी लागण्यासाठी या कायदेशीर प्रक्रियेला जो बराच वेळ लागतो, त्याला आळा बसायला हवा, असे ॲड, अंगना प्रधान म्हणतात. कौटुंबिक न्यायालयावरील ताण अलीकडे मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

# शिंदेंना गृहीत धरणे महायुतीसाठी गृहकलह!

महाराष्ट्राच्या राजकारणात कधी काय घडेल याचा नेम राहिला नाही. कालपर्यंत जे मुख्यमंत्री होते ते उपमुख्यमंत्री झाले, अन् जे उपमुख्यमंत्री होते ते मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रात महायुतीला पूर्ण बहुमत आहे, असं असूनही पूर्ण शक्तीचे सरकार स्थापन होऊ शकलेले नाही. महाराष्ट्राचं बरं-वाईट करणाऱ्या अदृश्य शक्तीलाही गेल्या २० दिवसांत हे घडवून आणता आले नाही.

हा इथल्या माती आणि माणसांचा गुण म्हणावा की अवगुण? ऐरावतही इथल्या मातीत रुतून बसावा, अशी चिवट आणि कसदार ही माती आहे. महाराष्ट्र हा वाळूचा किल्ला नाही, एखादी लाट यावी आणि सर्वकाही ढासळून जाईल. इथल्या गड-किल्ल्यांनी अनेक वादळं अंगावर झेलली, अनेक लाटा लीलया परतवून लावल्या. म्हणून ही माणसं इथली माती आपल्या भाळी लावून लढायला निघतात. भाजपला एकट्याला इथल्या माणसांनी पूर्ण बहुमत दिले नाही. आजच नाही तर गेल्या तीन निवडणुकांत दिले नाही. म्हणून इथल्या मातीतील माणसांशी जुळवून घेऊन, त्यांना ओंजारून-गोंजारूनच राज्य करावे लागत आहे. महायुती हा शब्द तीन पक्षांना एकत्र केल्यामुळे सार्थकी लागला होता. मात्र यंदाच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाने भाजपला तिसऱ्या सहकाऱ्याची गरज राहिली नाही, असे वाटावे, असेच त्यांचे वागणे सध्या सुरू आहे.

महायुतीमधील एक सहकारी नाराज आहे, हे लपून राहिलेले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार दोन दिवसांपासून दिल्ली मुक्कामी आहेत. मंत्रिमंडळात कोणाला स्थान द्यायचे आणि कोणाला किती स्थान द्यायचे याची खलबतं होत आहेत. हे सर्व होत असताना शिवसेनेचे नेते आणि आता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्यासोबत नसणं, यातच या सरकारमधील ताळमेळ कसा आहे हे सांगण्यासाठी पुरेसं आहे.

एकनाथ शिंदे हे भाजपची गरज कधीच नव्हते. भाजपची गरज होती, संख्या! विधानसभेच्या बहुमताच्या भोज्याला शिवण्यासाठी जो आकडा



लागतो त्यासाठीचे ते एक साधन होते. भाजपचे साध्य हे कायम सत्ता राहिले आहे. त्यासाठी जे-जे काही करावे लागले, आणि त्यासाठी ज्यांचा कोणाचा शिडीसारखा वापर करावा लागेल तो करण्याची तयारी या पक्षाने कायम दाखवली आहे. उत्तर प्रदेशमध्ये मुलायमसिंह यादवांना एकटी भाजप हातही लावू शकत नव्हती. तेव्हा त्यांनी कांशीराम यांची बसपा आणि त्यांच्या नेत्या मायावती यांना सोबत घेतले. बसपा आणि भाजपच्या युतीने भाजपचे काहीही बिघडले नाही, मात्र बसपा आणि मायावती यांचा मतदार हा भाजपकडे सरकला. मायावती यांना त्यांच्या विचारधारेच्या ३६० अंशांच्या कोनात बदल करावा लागला. बहुजन समाज पक्षाचे चिन्ह हत्ती, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पक्षाचे चिन्ह होते. त्यांनी स्वीकारलेल्या विचारधारेचे प्रतीक असलेले हे चिन्ह कांशीराम यांनी मोठ्या मेहनतीने मिळवले आणि टिकवले. मात्र भाजपच्या वळचणीला गेलेल्या मायावती यांनी हाथी नही गणेश हैं, ब्रम्हा विष्णू महेश हैं, म्हणत त्या विचारधारेलाच हरताळ फासली.

अवघ्या दहा-पंधरा वर्षांपूर्वी पंतप्रधानपदाच्या स्पर्धेत असलेल्या मायावती यांचा आज लोकसभा आणि उत्तर प्रदेश विधानसभेतून सुपडा साफ झाला आहे. जोपर्यंत उत्तर प्रदेशमध्ये भाजपला स्वबळावर उभे राहता येत नव्हते, तोपर्यंत त्यांनी तिथे बसपा आणि इतर पक्षांची मदत घेतली. भाजपला महाराष्ट्रात हेच शिवसेनेसोबत करायचे होते, मात्र उद्धव ठाकरेंनी वेळीच हे मनसुबे ओळखले. आता तिच वेळ एकनाथ शिंदेंवर आली आहे का, असे म्हणणे घाईचे होईल. मात्र सावधानतेचा इशारा नक्कीच आहे.

भाजपने २०१४, २०१९ आणि आता २०२४ मध्ये सलग तीन निवडणुकांमध्ये शतकी आकडे गाठले आहेत. १२२, १०५ आणि १३२ अशी त्यांची कामगिरी राहिली आहे. १९९५ नंतर शंभरपेक्षा जास्त जागा जिंकणारा महाराष्ट्रात कोणताच पक्ष नव्हता. भाजपने शंभरी गाठली होती, मात्र त्यांना तिन्ही वेळा स्वबळावर सत्ता मिळवता आलेली नाही. २०१४ मध्ये त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवली होती. मात्र २०१९ साली पुन्हा एकत्रित शिवसेनेसोबत त्यांची युती होती. तर २०२४ मध्ये शिवसेनेच्या मोठ्या गटाचे आणि राष्ट्रवादीच्या मोठ्या गटाची साथ त्यांना होती, त्यामुळे १३२ चा चमत्कार भाजप करू शकली हेही विसरता येणार नाही. अजित पवार यांची राष्ट्रवादी ही कायम सत्तेत राहिलेल्या शिलेदारांची आहे. त्यामुळे अडीच वर्षही ते सत्तेबाहेर राहू शकले नाहीत. अजित पवार आणि फडणवीस यांची मैत्रीदेखील अधिक गहिरी असल्याचे गेल्या काही दिवसांत दिसून आले आहे. भाजपला स्वबळावर सत्ता मिळत नाही, हे लक्षात आल्यामुळेच त्यांनी २०१९ मध्ये मित्र बदलण्याची तयारी सुरू केली होती. राष्ट्रवादीसोबत त्यांचे सूत जुळत आले होते, त्यातूनच दीड दिवसाचे सरकार अस्तित्वात आले होते. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात आणि त्यातही चार ते पाच विविध भौगोलिक विभागात विभागलेल्या राज्यात एकहाती सत्ता मिळणे कठीण. त्यामुळे राष्ट्रवादीला सोबत घेण्याची रणनीती तयार केली गेली. राष्ट्रवादीचा १९९९ पासूनचा आलेख पाहिला तर या पक्षाला २००४ साली मिळालेल्या ७१ जागा सोडल्या तर ४० ते ५५ दरम्यान कायम जागा मिळत राहिल्या आहेत.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई १-४०० ०१८.
दुरध्वनी क्र.०२२-२४९२४३४१, ई-मेल selcentralmumbai.ee@mahapwd.gov.in
ई निविदा सुचना क्र.३५ सन २०२४-२५ (1st Call)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील कामाकरिता बी १ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात याव्या. कोणतेही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | W21034/2024-25Providing Replacement of Service Cable from Meter to Panel for The Circle No.7,8,6, Anda Cell, Godown, Hospital, Jail Court, Pump Room, Canteen, CCTV Room, Mulakhat Kaksha & Office, Flour Mill, Superintendent Quarter, Turung Adhikari Quarter, Jail Entrance etc. at Arthur Road Jail, Mumbai. | 1308767/- |
| 2 | W21038/2024-25Providing Replacement of Service Cable From Meter to Panel for The Circle No.1,3,10,11,12, Kitchen, Vegetable Godown and Cold Storage, Judiciary area, Superintendent Office, Senior Cabin, Jail Staff Office, VC Room, Deputy Superintendent Office etc. at Arthur Road Jail, Mumbai. | 1249393/- |
| 3 | W21024/2024-25 Providing Repairs to Electrical Installation Including LED Fittings and Ceiling Fans for Ground Floor at Barrack no.1, 2,3 & 4 of Circle No.1 at Arthur Road Jail Compound, Mumbai. | 1017139/- |
| 4 | W31033/2024-25 Providing Structural Repairs Addition Alteration to St. Lights with Octagonal Poles Brackets LED Fittings under Ground Cables etc. at Saifed Maidan Police Training Ground at Worli Police Camp Worli Mumbai. | 1039346/- |
| 5 | H33024 of 2024-25 Providing Lift Operators for Operation of Lifts installed at Mazgaon Court, Mazgaon, Mumbai | 1519056.00 |

१ वरील अदाजीत रक्कमेत जी.एस.टी. समाविष्ठ नसून टेकेदारानी निविदेत दर भरताना जी.एस.टी. वगळून दर नमुद करावा. अदाजीत रकमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी.एस.टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.
२ ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१७.१२.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.
३ ई निविदा उघडणे : दि.०२.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० नंतर
जा.क्र.काअ/मपुविवि/निविदा/६०७९/२०२४
दिनांक : ११/१२/२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/५०८७

Sd/-
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग
सा.बां.विभाग वरळी

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू : पाच वर्षात केवळ २३ टक्के काम पूर्ण, प्रकल्प पूर्णत्वासाठी मे २०२८ उजाडणार

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

मुंबईष्ठवांद्रे-वरळी सागरी सेतूचा विस्तार वर्सोव्यापर्यंत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या कामास २०१९ मध्ये सुरुवात झाली असून पाच वर्षात या प्रकल्पाचे केवळ २३ टक्के काम पूर्ण झाले आहे. आव्हानात्मक काम आणि २०२० ते २०२२ दरम्यान काही कारणाने काम पूर्णत बंद असल्याने त्याचा फटका या प्रकल्पाला बसला आहे. त्यामुळेच हा प्रकल्प २०२५ ऐवजी आता मे २०२८ मध्ये पूर्ण होणार आहे.

मुंबई शहर आणि पश्चिम उपनगरातील वाहतूक कोंडी दूर करून प्रवास अतिवेगवान करण्यासाठी सागरी सेतू प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत एमएसआरडीसीकडून वांद्रे ते वरळी सागरी सेतू बांधण्यात आला असून हा सेतू गेल्या काही वर्षापासून वाहतूक सेवेत



दाखल झाला आहे. या वांद्रे-वरळी सागरी सेतूचा वांद्रे ते वर्सोवा असा विस्तार करण्याचा निर्णय घेत एमएसआरडीसीने वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू बांधण्याच्या कामास सुरुवात केली. २०१९मध्ये या १७.१७ किमीच्या सागरी सेतूच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मात्र २०१९ ते २०२२ मध्ये या प्रकल्पाचे काम केवळ अडीच टक्के झाले. टाळेबंदी आणि कंत्राटदाराच्या भागीदारीमध्ये आलेल्या अडचणींमुळे २०२० ते २०२२ दरम्यान या प्रकल्पाचे काम पूर्णत ठप्प होते. याप्रकरणी कंत्राटदारावर कठोर दंडात्मक कारवाईही करण्यात आली होती. शेवटी मुख्य कंत्राटदाराने या सर्व अडचणी दूर करत २०२२ पासून कामाला सुरुवात केली. दरम्यान प्रकल्पाच्या आराखड्यात काही बदलही एमएसआरडीसीला करावा लागला. जुहू कनेक्टरला मच्छिमारांचा विरोध असल्याने हा बदल करावा लागला. २०२२ पासून खर्या अर्थाने या सागरी सेतूच्या कामाला सुरुवात झाली. तर आता कामाने वेग घेतला असून आतापर्यंत या सागरी सेतूचे २३ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकार्‍यांनी दिली. आतापर्यंत २३ टक्के काम पूर्ण झाले असले तरी सुरुवातीला अनेक अडचणी आल्याने काम ठप्प होते. पण आता मात्र काम वेगात सुरु आहे. तसेच समुद्रात काम करणे अत्यंत आव्हानात्मक असून अनेक प्रकारच्या परवानग्या सातत्याने घ्याव्या लागत आहेत. परिणामी कामास काहीसा वेळ लागत असल्याचेही अधिकार्यांनी स्पष्ट केले.

# १८ वर्षांपेक्षा कमी वयाचा चालक असल्यास वाहन जप्त होणार!

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

**१८ वर्षांपेक्षा कमी वयाचा चालक आढळल्यास जागच्या जागीच वाहन जप्त करुन पोलिसांनी ताब्यात घ्यावे, असे आदेश राज्य पोलिसांकडून नव्याने देण्यात आले आहेत. या शिवाय मालवाहतुकीसाठी २० वर्षे ही वयोमर्यादा असून ती सक्तपणे पाळण्यात यावी, असे आदेशही देण्यात आले आहेत. याशिवाय ई-चलनाबाबतही आदर्श कार्यप्रणाली जारी करण्यात आली आहे.**

वाहतूक विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. सुरेशकुमार मेकला यांनी हे परिपत्रक जारी केले आहे. ई-चलन जारी करणे आणि दंडात्मक वसुली तसेच वाहन जप्तीबाबत ही कार्यप्रणाली जारी करण्यात आली आहे. १८ वर्षांपेक्षा कमी वयाचा चालक



आढळल्यास पोलिसांकडून वाहन ताब्यात घेतले जाते. संबंधित चालकाच्या पालकांना वा संबंधित व्यक्तीला पाचारण केले जाते. चालक तसेच पालकावर दंडात्मक कारवाई केली जाते. आता नव्या परिपत्रकानुसार पोलिसांना वाहन जप्तीचीही कारवाई करावी लागणार आहे. ई-चलनाबाबत जारी करण्यात आलेल्या कार्यप्रणालीनुसार, तडजोडपात्र आणि विनातडजोड असे ई-चलनाचे दोन प्रकार आहेत. तडजोडपात्र ई-चलन प्रकरणात दोषी व्यक्तीने स्वखुशीने रक्कम भरण्याची तयारी दाखवल्यास सक्षम पोलीस अधिकाऱ्याने रक्कम स्वीकारून ई-चलनाचा निपटारा करावा, असे नमूद करण्यात आले आहे. मात्र संबंधित व्यक्ती तडजोड रक्कम भरण्यास तयार नसल्यास अशा प्रकरणात पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करावेत. विना-तडजोड प्रकरणात तात्काळ दोषारोषपत्र जारी करण्याचे आदेश या परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत. न्यायालयात खटला दाखल झाल्यानंतर संबंधित व्यक्ती हजर न राहिल्यास वाहन जप्त करता येते. मात्र त्यासाठी न्यायालयातून रीतसर परवानगी घेऊन वाहन जप्त करण्यात यावे. न्यायालयाकडून परवानगी मिळाल्याशिवाय वाहन परस्पर जप्त करू नये, असेही या परिपत्रकात म्हटले आहे. पोलिसांकडून जबरदस्तीने वाहन जप्तीसारखे प्रकार केले जात असल्यामुळेच राज्य पोलिसांकडून नव्याने परिपत्रक जारी करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. या परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित पोलिसांवर कारवाई केली जाणार आहे.

# ‘ताज महाल बांधणाऱ्या मजुरांचे हात कापण्यात आले, पण राम मंदिराच्या मजुरांना...’ आदित्यनाथांनी का केले पंतप्रधानांचे कौतुक?

■ **मुंबई : विशाल कारंडे**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी, ताज महाल बांधणाऱ्या मजुरांचे हात कापण्यात आले होते तर, अयोध्येतील राम मंदिर बांधणाऱ्या मजुरांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सन्मान केल्याचे म्हणत, मजुरांना इतिहासात कशी वागणूक मिळाली आणि सध्या कशी वागणूक मिळते याबाबत तुलना केली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ शनिवारी रात्री मुंबईतील एका कार्यक्रमात बोलत होते. याबाबत बोलताना योगी आदित्यनाथ म्हणाले, ‘तुम्ही पाहिले असेल २२ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराच्या उद्घाटनावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मंदिर बांधणाऱ्या सर्व मजुरांचा कसा सन्मान करत होते. त्यावेळी पंतप्रधान



मोदी मजुरांवर फुलांचा वर्षाव करत होते. तर, दुसरीकडे ताज महाल बांधणाऱ्या मजुरांचे हात कापण्यात आले होते.’ उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावेळी असेही नमूद केले की, इतिहासात कापड उद्योगातील अनेक उत्कृष्ट कारागिरांचे हातही कापले गेले होते. ज्यामुळे संपूर्ण परंपरा आणि वारसा नष्ट झाला. ‘आज भारतात श्रमिकांचा आदर केला जात आहे. त्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळत आहे. दुसरीकडे मात्र, असे राज्यकर्ते होऊन गेले ज्यांनी मजुरांचे हात कापले आणि उत्कृष्ट कापड कारागिरांचा वारसा आणि परंपरा नष्ट केली,’ असे आदित्यनाथ वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरम कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

१७ व्या शतकात मुघल सम्राट शाहजहानने ताजमहलचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मजुरांचे हात कापण्याचे आदेश दिल्याचा दावा केला जातो. पण, हा दावा सिद्ध करणाऱ्या कोणत्याही ऐतिहासिक नोंदी आजपर्यंत सापडल्या नाहीत.

भारताचा इतिहास आणि वारसा याबद्दल पुढे बोलताना आदित्यनाथ म्हणाले की, ‘काही लोकांना देशाची प्रगती किंवा भारतीयांना जागतिक स्तरावर मिळत असलेला आदर सहन होत नाही. जे आज भारताचा वारसा सांगत आहेत, ते देशाच संस्कृती अस्तित्वात आली तेव्हा जन्मलेही नव्हते.’

# वांद्रयातील म्हाडा भवनात आता नागरी सुविधा केंद्र; नागरिकांची पायपीट थांबणार

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात अर्थात म्हाडा भवनात दररोज शेकडोंच्या संख्येने नागरिक विविध कामांसाठी निवेदने, पत्र, तक्रारी वा इतर कागदपत्रे घेऊन येतात. अशावेळी त्यांना संबंधित विभागीय मंडळाच्या कार्यालयात जाऊन आपले पत्र, निवेदन वा कागदपत्रे जमा करावी लागतात. पण आता मात्र भवनाची पायरी न चढता भवनाच्या आवारातच एकाच ठिकाणी कोणत्याही विभागाची कागदपत्रे देता येणार आहेत. कारण आता म्हाडा भवनात नागरी सुविधा केंद्र बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या कामासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. येत्या दीड-दोन महिन्यात हे नागरी सुविधा केंद्र कार्यान्वित करण्याचे म्हाडाच्या मुंबई मंडळाचे नियोजन आहे. हे केंद्र कार्यान्वित झाल्यास एकाच ठिकाणी म्हाडा प्राधिकरणासह सर्व विभागीय मंडळांच्या कागदपत्रांची स्वीकृती केली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांसाठी हा मोठा दिलासा ठरणार आहे.

म्हाडा भवनात दररोज पाच हजारांहून अधिक नागरिक विविध कामांसाठी येतात. म्हाडा प्राधिकरण, मुंबई मंडळ, कोकण मंडळ, झोपु मंडळ, दुरूस्ती मंडळाशी संबंधित पत्रे, निवेदन, तक्रारी किंवा इतर काहीही कागदपत्रे जमा करावी लागतात. अशावेळी हे प्रत्येक मंडळ वेगवेगळ्या





मजल्यांवर असल्याने वा कोणत्या मजल्यावर कोणत्या मंडळाचे कार्यालय आहे ते अनेक नागरिकांना माहित नसते. अशावेळी नागरिकांना म्हाडा भवनात फेऱ्या माराव्या लागतात. तसेच आपल्या निवेदनाचे, पत्राचे, तक्रारीचे पुढे काय झाले यासंबंधी माहिती घेण्यासाठीही म्हाडा भवनात येऊन पाठपुरावा करावा लागतो. पण आता मात्र नागरिकांची ही गैरसोय लवकरच दूर होणार आहे. कारण सर्व कागदपत्रांच्या स्वीकृतीचे एकत्रिकरण करून नागरिकांना चांगली सुविधा निर्माण करुन देण्यासाठी म्हाडाने मुंबई मंडळाच्या माध्यमातून नागरी सुविधा केंद्र विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हाडा भवनाच्या आवारात मोकळ्या जागेत हे नागरी सुविधा केंद्र बांधण्यात येणार आहे. २ कोटी ३६ लाख ७८७ रुपये खर्चाच्या या नागरी सुविधा केंद्राच्या बांधकामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी मंडळाने नुकतीच निविदा प्रसिद्ध केली आहे. मंडळाच्या निविदेनुसार १९ डिसेंबरपर्यंत निविदांची स्वीकृती होणार असून २० डिसेंबरला निविदा खुल्या केल्या जाणार आहेत. लवकरात लवकर ही निविदा प्रक्रिया पूर्ण करून बांधकामाला सुरुवात करण्याचे मंडळाचे नियोजन असल्याची माहिती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. निविदेनुसार बांधकामाचा कालावधी एका महिन्याचा आहे. त्यामुळे या कालावधीसह निविदा प्रक्रिया पूर्ण करून बांधकाम पूर्ण होण्यासाठी दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

# दादरमधील हनुमान मंदिर हटवण्याच्या निर्णयाबाबत मोठी माहिती, मंगलप्रभात लोढा म्हणाले...

■ **मुंबई : सम्यक कासारे**

दादर स्थानकावर विकासात्मक कामे करण्यासाठी मध्य रेल्वेच्या दादर रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडे असणारे सुमारे ८० वर्षे जुने हनुमान मंदिर हटवण्याची नोटीस मध्य रेल्वेकडून मंदिर प्रशासनाला देण्यात आली होती. दरम्यान, या नोटिशीला आता स्थगिती देण्यात आली आहे. आमदार मंगलप्रभात लोढा यांनी रेल्वे प्रशासनाशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचं लोढा यांनी एक्सच्या पोस्टद्वारे सांगितलं आहे.

ते पुढे म्हणाले, ‘आदेश थेट रद्द करता येत नाही. त्यामुळे आधी स्थगिती आणून त्यानंतर रद्दचा आदेश देता येतो. त्यानुसार हा निर्णयही रद्द केला जाईल. त्यामुळे मंदिराचं आता काही होणार नाही. मंदिरात पूर्वीप्रमाणेच





आरती सुरू राहणार.’ ‘उद्धव ठाकरेंनी भाजपाचं हिंदुत्त्व एक्स्पोज केल्यानंतर रेल्वेने त्यांची नोटीस स्थगित केली आहे. भाजपाच्या लोकांनी तिथे जाऊन नाटक केलं. स्थगिती हस्तलिखिताने आली आहे. म्हणजे घाईघाईने घेतलेला हा निर्णय आहे’, असं आदित्य ठाकरे म्हणाले. दादर स्थानकात बदल करण्यासाठी पूर्वेकडील पादचारी पुलाशेजारी असलेले हनुमान मंदिर हटविण्याची नोटीस रेल्वे प्रशासनाने पाठवली होती.

यासंदर्भात माहिती दिली आहे. भाजपा मुंबई शहर अध्यक्ष आशीष शेलार, विश्वहिंदू परिषद आणि बजरंग दलाचे पदाधिकारी यांनी रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. गेल्या दोन दिवसांपासून त्यांच्या संपर्कात होते. अधिकाऱ्यांना भेटून सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार, मंदिर हटवण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे’, असं माजी मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले. तसंच, केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव

# कोरेगाव-भीमा येथे शौर्यदिन साजरा करण्यास उच्च न्यायालयाची परवानगी; २२ डिसेंबर ते ५ जानेवारी दरम्यान तयारीस शासनाला अनुमती

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

येत्या १ जानेवारी रोजी कोरेगाव-भीमा येथील लढाईच्या वर्धापन दिनानिमित्त साजरा होणाऱ्या कार्यक्रमाची व्यवस्था करण्यासाठी तसेच ऐतिहासिक विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य सरकारला उच्च न्यायालयाने नुकतीच परवानगी दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणे जिल्ह्याधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारने उच्च न्यायालयात परवानगीसाठी याचिका केली होती. न्यायमूर्ती श्रीराम




मोडक यांच्या एकलपीठाने या याचिकेची दखल घेऊन विजयस्तंभाच्या वादग्रस्त जागेवर प्रवेश करण्यासाठी राज्य सरकारला परवानगी दिली. त्यानुसार, २२ डिसेंबर ते ५ जानेवारी या कालावधीत सरकरला कार्यक्रमाची तयारी करण्यास परवानगी असणार आहे. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ५ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत सर्वसामान्यांना येथे प्रवेश देण्यात येईल, असेही न्यायालयाने नमूद केले.

# बाणगंगा पुनरुज्जीवन प्रकल्प, रामकुंड जतनासाठी ‘हार्बर इंजिनीअरिंग’

■ **मुंबई : यश सावंत**

निवडणूक आणि आचार संहिता संपल्यानंतर आता ऐतिहासिक बाणगंगा तलावाच्या जीर्णोद्धाराच्या कामाला वेग आला आहे. बाणगंगा तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत शोध लागलेले रामकुंड जतन करण्यासाठी आता राज्य सरकारच्या ‘हार्बर इंजिनीअरिंग’ विभागाची मदत घेतली जाईल. त्याचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून या महिनाअखेरीस हे काम सुरू होण्याची शक्यता आहे. मलबार हिल परिसरात वाळकेश्वर येथे असलेल्या बाणगंगा तलावाला ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. मलबार हिल टेकडीच्या पश्चिम किनाऱ्यावरील हे एक गोड्या पाण्याचे कुंड आहे. आजूबाजूने समुद्राने वेढलेल्या या भागात मध्यभागी गोड्या पाण्याचे कुंड असल्यामुळे या बाणगंगा तलावाविषयी विशेष आकर्षण आहे. तलावाभोवती मंदिरे, समाधी, धर्मशाळा, मठ असून या तलाव परिसराला धार्मिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमही या तलावाच्या काठावर होत असतात. तलावाला लागूनच व्यंकटेश बालाजी मंदिर, सिद्धेश्वर शंकर मंदिर, बजरंग आखाडा व वाळकेश्वर मंदीर इत्यादी प्रसिद्ध मंदिरे आहेत. बाणगंगा तलाव पुनरुज्जीवन



प्रकल्पांतर्गत खोदकाम करताना ढिगाऱ्याखाली गाडल्या गेलेल्या अकराव्या शतकातील रामकुंडाचा शोध ऑक्टोबर २०२३ मध्ये लागला. हे रामकुंड पुनरुज्जीवित करून त्याला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यात येणार आहे. बाणगंगा ते अरबी समुद्र असा या रामकुंडाचा मार्ग आहे. त्यामुळे या कामासाठी अनेक परवानगी लागणार असून हे काम विशेष स्वरुपाचे आहे. त्यामुळे हे काम सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या हार्बर इंजिनीअरिंग विभागाला देण्यात येणार आहे. या कामासाठी अडीच कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी पालिकेच्या डी विभाग कार्यालयाने प्रस्ताव तयार केला असून तो प्रशासकीय मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

पान १ वरुन...

## देवेंद्र फडणवीसांच्या...

शंभूराज देसाई (पाटण), शिवेंद्रराजे भोसले (सातारा), जयकुमार गोरे (माण) व मकरंद पाटील (वाई) यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळालं आहे.

१०. पुणे जिल्हयाला तीन कॅबिनेट व एक राज्यमंत्रीपद मिळालं आहे.

११. नाशिक व जळगाव जिल्हयाला तीन कॅबिनेट मंत्रीपदं मिळाली आहेत.

१२. नाशकात दादा भुसे, माणिकराव कोकाटे व नरहरी झिरवाळ यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळालं आहे.

१३. जळगावात गुलाबराव पाटील, गिरीश महाजन व संजय सावकारे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळालं आहे.

१४. रत्नागिरी जिल्हयाला दोन कॅबिनेट मंत्री मिळाले आहेत, तर एक राज्यमंत्री मिळाले आहेत. उदय सामंत व नितेश राणे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळालं आहे, तर योगेश कदम यांना राज्यमंत्रीपद मिळालं आहे.

१५. रायगड जिल्हयाला दोन कॅबिनेट मंत्री मिळाले आहेत. यामध्ये आदिती तटकरे व भरत गोगावले यांचा समावेश आहे.

१६. कोल्हापूर जिल्हयाला दोन कॅबिनेट मंत्री मिळाले आहेत. यामध्ये हसन मुश्रीफ व प्रकाश आबिटकर यांचा समावेश आहे.

१७. ठाणे जिल्हयाला दोन मंत्री लाभले आहेत. यामध्ये एकनाथ शिंदे व प्रताप सरनाक यांचा समावेश आहे.

१८. मुंबईला मंगलप्रभात लोढा व आशिष शेलार यांच्या रुपाने दोन कॅबिनेट मंत्री लाभले आहेत.

१९. राज्यातील १९ जिल्हयांना किमान एक तरी मंत्री लाभला आहे.

२०. १७ जिल्हयांना एकही मंत्रीपद मिळालेलं नाही.

## ‘पोलीस व्यवस्थेने...

स्थानिकांनी असा आरोप केला की, पोलिसांनी जवळच्या रुग्णालयात काम करणाऱ्या वचला मानवते नावाच्या महिलेला मारहाण केली. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. असे असले तरी पोलिसांनी हे आरोप नाकारले आहेत. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे. हिंसाचारानंतर लगेचच दलित वस्त्यांमध्ये पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन केल्याचा आरोपही करण्यात येत आहेत. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, कायद्यानुसार आरोपांची चौकशी केली जाईल आणि कोणी दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल.

## मुंबईला जोडणारा वाशी...

तर दुसरा पूल १९९७ मध्ये बांधण्यात आला असून हा सहा पदरी पूल आहे. मुंबईकडे येण्यासाठी तीन मार्ग आणि वाशीकडे जाण्यासाठी तीन मार्ग या पुलावर आहेत. दरम्यान मुंबईत दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे. मुंबईत येणाऱ्या वाहनांची संख्याही वाढलीय. मुंबई आणि नवी मुंबई दरम्यान वाहतूक देखील वाढली, यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झालाय. सायन-पनवेल महामार्ग १० लेनमधील विस्तारामुळे ही समस्या आणखी वाढलीय. वाहतुकीची ही समस्या लक्षात घेत एमएसआरडीसीने दोन पूलाच्या बांधकामाचा ५५९ कोटी रुपयांचा प्रकल्प लार्सन अँड टुब्रोला दिला. दोन्ही पूलांची लांबी ३.१४ किलोमीटर असून याची संरचना १९९७ सालची आहे. नव्याने उघडलेल्या नवी मुंबईला जाणाऱ्या पुलामुळे आधीच वाहतुकीचा प्रवाह सुधारलाय. मुंबईला जाणाऱ्या पुलामुळे कनेक्टिव्हिटी आणखी वाढेल अशी अपेक्षा आहे.

## विमानतळाची धावपट्टी...

दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे. गुरुवारी ही चाचणी पूर्ण झाल्याने पुढील चार महिन्यात नवी मुंबई विमानतळावरुन विमानाचे उड्डाण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये ११ ऑक्टोबरला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले लढाऊ विमान सी-२९५ हे उतरविण्यात आले होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन धावपट्टी आहेत. त्यातील दक्षिण धावपट्टी पहिल्या टप्प्यात सुरू होणार आहे. या धावपट्टीची ३७०० मीटर लांबीची आणि ६० मीटर रुंदीची आहे. पहिल्या टप्प्यात मालवाहू विमानतळ या विमानतळावरुन सुरू होणार आहे. चाचणीचे महत्त्व विमान उतरविण्यासाठी वैमानिकांना धावपट्टीवरील मार्गाचा अचूक संदेश सूचकता दर्शविणाऱ्या विज दिव्यांचा आधार घ्यावा लागतो. धावपट्टीवरील दिवे मार्गातील अचूक सूचनेमुळे वैमानिकांना धावपट्टीवरील दृष्यमानता कमी असताना याच दिव्यांच्या आधारे विमान उतरवावे लागते. त्यामुळे या चाचणीला विशेष महत्त्व आहे.

# शिवसेना फोडताना संविधानाचा विसर? ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांचा सवाल

■ **मुंबई : सम्यक कासारे**

महाराष्ट्रातील सत्ता संघर्षामध्ये संविधानाच्या मूल्यांची धुळधाण उडवली गेली. घटनाबाह्य सरकारला राजमान्यता दिली गेली. सर्वोच्च न्यायालयाने पक्षफुटी, बंडखोरी, राज्यपालांच्या भूमिकेवर कडक ताशेरे ओढले. पण, शिवसेनेच्या आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणात न्याय मिळाला नाही. शिवसेना फोडताना, राज्याची सत्ता ताब्यात घेताना संविधान का आठवले नाही? तेव्हा संविधानाचा सन्मान का केला नाही, असा सवाल शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभेत संविधानावरील चर्चेत केला.

सरकार स्थापनेचे आमंत्रण देऊन राज्यपाल घटनाबाह्यरित्या बंडखोर गटाला अधिमान्यता देऊ शकत नाहीत. विधिमंडळाच्या प्रक्रियेमध्ये अशारितीने राज्यपाल हस्तक्षेप करू शकत नाही, अशी



टिपण्णी चंद्रचूड केली होती. सरन्यायाधीशांनी ताशेरे जरूर ओढले पण, न्याय दिला नाही. आमदारांची फोडाफोडी झाली तेव्हा महाराष्ट्रात संविधान पाळले गेले असे वाटते का, असा सवाल सावंत यांनी केला.

# समुद्र स्वच्छता यंत्रणा वापराविनाच, स्वच्छतेअभावी किनाऱ्यांची दुर्दशा; लाखोंची यंत्र धूळखात

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार शहराच्या पश्चिमेला विस्तीर्ण असा समुद्र किनारा आहे. या किनाऱ्यांची स्वच्छतेसाठी महापालिका व अर्नाळा ग्रामपंचायतीने समुद्र स्वच्छता यंत्र घेतली आहेत. मात्र सद्यस्थितीत त्या यंत्रांचा वापरच होत नसल्याने ही यंत्र धूळखात पडली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

वसई विरारचा परिसर असून या परिसराला अर्नाळा, सुरुची, भुईगाव, रानगाव, नवापूर, कळंब असे समुद्र किनारे लाभले आहेत. हे समुद्र किनारे पर्यटनाच्या दृष्टीने आकर्षण ठरत असून या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. समुद्र किनाऱ्याची स्वच्छता राखणे स्थानिक प्रशासनासाठी मोठे जिकरीचे काम ठरत होते. मनुष्यबळाचा वापर करून विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता करणे अशक्य ठरत होते. या किनाऱ्यावर लाटांसोबत मोठ्या प्रमाणात कचरा वाहून येत असतो तर काही वेळा पर्यटकांकडून कचरा टाकला जातो. यात प्लास्टिक व इतर प्रकारच्या कचऱ्याचा समावेश असतो. सामाजिक संस्थांच्या मदतीने अधून मधून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता मोहीम राबविली जाते. मात्र यात सातत्य राखणे अवघड असल्याने किनारे अस्वच्छ राहत होते. या समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता यांत्रिक पद्धतीने करता यावी यासाठी वसई विरार महापालिकेने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून समुद्र किनारा सफाई यंत्र खरेदी केले होते.

यासाठी ६७ लाख रुपये इतका निधी खर्च केला होता. तर दुसरीकडे विरारचा अर्नाळा समुद्र किनारा हा ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याने अर्नाळा



ग्रामपंचायतीला महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाने 'ट्रॅक्टर बीच क्लिन मशीन' दिली होती. यंत्रणेचे उदघाटन होऊन काही महिने उलटून गेले तरीही मात्र ग्रामपंचायतीकडून या यंत्राचा वापरच केला गेला नाही. त्यामुळे ही यंत्रणा अक्षरशः धूळखात पडली असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाखो रुपये खर्चून यंत्रणा घेतली त्यामुळे समुद्र किनारे स्वच्छ राहतील अशी आशा नागरिकांना होती. मात्र यंत्रणाच कार्यान्वित केली नसल्याने समुद्र किनारे कचरा व घाणीचे साम्राज्य पसरून अस्वच्छ राहू लागले आहेत असे नागरिकांनी सांगितले आहे. समुद्र स्वच्छता यंत्राच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्यांची स्वच्छता केली जाणार होती. यात कचरा उचलणे, त्याचे संकलन करणे, संकलित केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाळूत साचून व अडकून असलेला कचरा चाळून त्या कचऱ्याचे संकलन करणे, वाळूचे सपाटीकरण करणे यासारखी कामेही होणार होती. मात्र यंत्रणाच कार्यान्वित नाही त्यामुळे यंत्र पडून आहेत.

वसई विरार मधील समुद्र किनारे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. विशेषतः विकेंडला मोठ्या संख्येने पर्यटक या भागात पर्यटनासाठी येत असतात.पर्यटकांचे आर्कषण असलेले समुद्रकिनारे सध्या घाणीच्या विळख्यात सापडत आहे. या अस्वच्छतेमुळे येथील पर्यटनाला फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## 'बजेट वाढवा पण शाळा सुरू करा', स्नेहा दुबेंकडून पालिका अधिकाऱ्यांना निर्देश

**■ वसई : प्रतिनिधी**

वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी पहिल्याच आढावा बैठकीत पालिका अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. शाळा सुरू करण्याबाबत पालिकेच्या उदासिनतेबबाबत त्या चांगल्याच संतप्त झाल्या. पालिकेचे बजेट वाढवा, मॅरेथॉन सारखे उत्सव बंद करा पण शाळा सुरू करा असे कडक निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. स्नेहा दुबे पंडित या वसई विधानसभेवर निवडून आल्या आहेत. आमदार झाल्यावर त्यांनी कामांना सुरुवात केली आहे. पालिकेने कुठली कामे केली केली, कुठली कामे प्रलंबित आहेत त्या कामांचा आढावा घेण्यासाठी स्नेहा दुबे यांनी पालिका अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत समाधानकारक काम न आढळल्याने त्यांनी पालिका अधिकाऱ्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. वसई विरार महापालिकेच्या स्थापनेला १४ वर्षे झाली आहेत. मात्र महापालिकेची एकही शाळा नाही. याबाबत त्यांनी पालिका अधिकाऱ्यांना जाब विचारला. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या ११७ शाळा हस्तांतरित करण्याबाबत विचार असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी



सांगितले. परंतु या शाळा ताब्यात घेतल्या तर पालिकेवर १०० कोटींचा 'बोजा पडेल असे उत्तर पालिका अधिकाऱ्यांनी दिले. ते ऐकतात स्नेहा दुबे चांगल्याच भडकल्या. शिक्षण देणे हे महापालिकेचे मूलभूत कर्तव्य आहे. त्याला बोजा कसा म्हणू शकता असा सवाल त्यांनी केला. पालिकेच्या अर्थसंकल्पात १०० कोटींची वाढ करा. वेळ पडली तर मॅरेथॉन आणि पैशांची उधळपट्टी करणारे उत्सव बंद करा, पण शाळा सुरू करा आणि त्यांनी सांगितले. ११७ शाळा स्वतंत्र सुरू करण्यापेक्षा दहा दहा शाळा एकत्रित करून एकेक शाळा विकसित करा, अशी सूचना त्यांनी केली. जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांचे वेतन शासनाकडून दिले जाते. यासाठी शासनाकडे पाठपुरावा करून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सोडवावा, असेही त्या म्हणाल्या पर्यटन आणि तिर्थस्थळाच्या विकासासाठी काय योजना आहेत त्याबाबत दोन आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. आरोग्य सुधारणा कशी करणार? राखीव भुखंडांवरील अतिक्रमण, पाणी योजनेतील अनियमितताट आदींबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र त्याच्यावर अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तरं देता आली नाहीत. विकास कामे सुरू असताना त्याची माहिती नागरिकांना व्हावी यासाठी फलक लावण्याचे आदेश त्यांनी दिले. अधिकाऱ्यांना समाधानकारक उत्तरं देता आली नाहीत. फक्त कागदी घोडे नाचवत असल्याचे दिसले. शाळा सुरू करण्याबाबत पालिकेचे असलेली उदासीनता संतापजनक होती. यापुढे दर महिन्याला बैठक घेणार असून दिलेल्या सूचना आणि कामे झाली की नाही त्याचा आढावा घेणार असल्याचे स्नेहा दुबे पंडित यांनी सांगितले.

## दिडशे ते तीनशे मीटरपर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना प्रभागस्तरावर मंजुरी

**■ कल्याण : आकाश कांबळे**

शासनाच्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचा आधार घेऊन कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने १५० ते ३०० चौरस मीटर भूखंडावरील इमारतींचे बांधकाम आराखडे पालिकेच्या प्रभागस्तरावर स्वीकारणे आणि मंजूर करण्याचा पथदर्शी प्रस्ताव राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लहान भूखंड विकसित करणे, जुनी बांधकामे नियमित करण्याचा जमीन मालक, विकासकांचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे.

कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या संकल्पनेतून हा पथदर्शी प्रस्ताव नगररचना विभागाचे प्रभारी साहाय्यक संचालक सुरेंद्र टेंगळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नव्या इमारतींचे बांधकाम परवानगीसाठीचे आराखडे नगररचना विभागाकडून मंजूर केले जातात. कल्याण, डोंबिवली ही दोन्ही शहरे यापूर्वी गाव स्वरुपात होती. ग्रामपंचायत, नगरपालिका यांचे प्रशासन येथे होते. त्यावेळची गरज म्हणून नागरिकांनी आपल्या खासगी जमिनीवर कौलारू घरे, चाळींच्या जागी बंगले, इमारती बांधल्या. त्या बांधकामाच्या भूखंडाचे सर्व चटई क्षेत्र निर्देशांक यापूर्वीच मालकांनी वापरले. धोकादायक झालेली ही बांधकामे आता नव्याने उभारणीसाठी विकासक पुढे येत नाहीत. या बांधकामातून आम्हाला वाणिज्य किंवा सदनिकांच्या माध्यमातून वाढीव बांधकाम करणे शक्य होणार नाही, असा विकासकांचा दावा आहे. शहरातील ३५



ते ४० वर्षापूर्वी बांधलेली आता धोकादायक स्थितीत असलेली बांधकामे नव्याने उभी करण्यासाठी कोणीही विकासक पुढाकार घेत नाही. अशा बांधकामांच्या परवानगीचे प्रस्ताव प्रभागस्तरावर स्वीकारले, तेथेच साहाय्यक आयुक्तांच्या पुढाकाराने मंजूर झाले तर नागरिकांना स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध होईल. यासाठी नगररचना विभागाने सहकार्य करावे, अशी संकल्पना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी मांडली. हा प्रस्ताव आता अंमलात येत आहे.

एकत्रित विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीमुळे या बांधकामांना आता प्रभागस्तरावर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून मंजुरी मिळविणे जमीन मालक, बंगले, इमारत मालकांना शक्य होणार आहे, असे नगररचनेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. तसेच, १५० ते ३०० मीटरचे भूखंड जमीन मालकांनी व्यक्तीश किंवा भागीदारी पद्धतीने विकसित करण्याचा निर्णय घेतला.

## कल्याणमधील कपोते वाहनतळावर पालिकेचा ताबा; भाडे थकविल्याने ठेकेदार काळ्या यादीत

**■ कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील दिवंगत दिलीप कपोते वाहनतळाच्या ठेकेदाराने १ कोटी ८८ लाख ११ हजार १६८ रूपयांचे भाडे पालिकेकडे जमा केले नव्हते. ही रक्कम भरण्यासाठी पालिकेने वारंवार नोटीसा पाठवूनही ठेकेदार भाडे भरत नव्हता. यामुळे गुरुवारी पालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलीप कपोते वाहनतळाचा ठेकेदाला बाजूला करत वाहनतळ ताब्यात घेण्याची कार्यवाही केली. मागील फेब्रुवारीमध्ये या वाहनतळाचे उद्घाटन करण्यात आले होते. मे. कुमार एन्टरप्रायझेस, मे. श्री गुरूदत्त एन्टरप्रायझेस या दोन खासगी एजन्सी संयुक्त भागीदारीमधून हे वाहनतळ चालवित होत्या. फेब्रुवारी २०२४ पासून पहिल्या तीन महिन्यांसाठी ९४ लाख ५ हजार ५८४ रूपये दरमहा भाड्याने हे वाहनतळ ठेकेदारांना पालिकेने चालविण्यास दिले




होते. या वाहनतळामध्ये सुमारे २ हजार ७८० दुचाकी उभी करण्याची व्यवस्था आहे. सुरुवातीचे दोन महिन्याचे भाडे ठेकेदारांनी नियमितपणे पालिकेला दिले. मे ते नोव्हेंबर या कालावधीतील १ लाख ८८ हजार रूपयांचे भाडे भरण्यास ठेकेदार टाळाटाळ करत होते. ही रक्कम भरणा करावी म्हणून पालिका मालमत्ता कर विभागाने ठेकेदारांना नोटिसा पाठविल्या होत्या. ठेकेदार त्यास दाद देत नव्हता.

ठेकेदार भाड्याची थकित रक्कम भरणा करत नसेल तर त्या वाहनतळाचा ताबा पालिकेने घेऊन ते चालविण्यास सुरूवात करावी. तसेच ठेकेदारांचे या वाहनतळावरील नियंत्रण काढून टाकावे असे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, मालमत्ता विभाग उपायुक्त रमेश मिसाळ यांना दिले. वाहनतळाचा ताबा घेण्यासाठी उपायुक्त प्रसाद बोरकर, साहाय्यक आयुक्त सविता हिले, नियंत्रण अधिकारी प्रसाद ठाकुर, अधीक्षक जयराम शिंदे, प्रशांत धीवर यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. गुरुवारी दुपारी पालिकेचे विशेष पथक पोलीस बंदोबस्तात दिलीप कपोते वाहनतळावर पोहचले. सुरूवातीला ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी वाहनतळाचा ताबा देण्यास नकार दिला. ठेकेदाराच्या महिला कर्मचारी दाद देत नसल्याने उपायुक्त मिसाळ यांनी उपायुक्त अतुल झेंडे यांना संपर्क करून महात्मा फुले पोलीस ठाण्यातून वाढीव पोलीस बंदोबस्त मागविला. पोलिसांनी आक्रमक कारवाई करून ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांना वाहनतळातून बाहेर काढले. उपस्थितांच्या समक्ष पंचनामा करून पालिकेने कपोते वाहनतळाचा ताबा घेतला. शुक्रवारपासून पालिकेच्या चार कर्मचाऱ्यांनी चक्राकार पध्दतीने या वाहनतळावरील नियंत्रणाचे काम सुरू केले आहे. अधिक माहितीसाठी ठेकेदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याकडून संपर्काला प्रतिसाद मिळाला नाही.

## वाळू व्यावसायिकांच्या १८ लाखाच्या बोटी नष्ट; भिवंडीतील कशेळी, दिवे-अंजूर खाडीत महसुल विभागाची कारवाई

**■ अंबरनाथ : सतिश सोनावणे**

भिवंडी तालुक्यातील अंजुरदिवे, कशेळी, आलिमघर खाडी भागात दिवसरात्र बेकायदा वाळू उपसा करणाऱ्या वाळू व्यावसायिकांच्या १८ लाखाच्या बोटी, सक्शन पंप असे साहित्य शुक्रवारी सकाळी भिवंडी महसूल विभागाच्या पथकाने नष्ट केले. अचानक करण्यात आलेल्या या कारवाईने वाळू व्यावसायिका, मजुरांची पळापळ झाली. महसूल अधिकाऱ्यांची पथके आपल्या दिशेने येत आहेत याची चाहूल लागताच वाळू उपशांच्या बोटींवरील मजूर, त्यांचे प्रमुख बोटी, सक्शन पंप टाकून पळून गेले.

या कारवाईच्यावेळी पथकाने आलिमघर येथे खाडी पात्रात उभे असलेले एक बार्ज, दोन सक्शन पंप कौशल्याने खाडी किनारी आणून तोडकाम पथकाच्या साहाय्याने नष्ट केले. काल्हेर येथे बंदर किनाऱ्याजवळ दोन



भिवंडी जवळील कशेळी, अंजुरदिवे खाडी भागात दिवस-रात्र वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारी भिवंडीचे तहसीलदार अभिजित खोले यांच्याकडे आल्या होत्या. या बेकायदा वाळू उपशाची खात्री केल्यानंतर उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या आदेशावरून तहसीलदार अभिजित खोले, खारबाव, कोन, अंजुर, काल्हेर येथील मंडळाधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांनी शुक्रवारी सकाळी अचानक कशेळी, अंजुरदिवे खाडी भागात धाड टाकली. सक्शन पंप नष्ट करण्यात आले. एका बार्जला कटरने छिद्र पाडून तो खाडीत बुडविण्यात आला. अशाप्रकारे वाळू व्यावसायिकांचे बार्ज, स्कशन पंप अशी एकूण १८ लाखाची मालमत्ता कारवाई पथकाने नष्ट केली. पथकाने या भागात वाळू व्यावसायिक, मजुरांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण ते पळून गेले होते. भिवंडी येथे कारवाई सुरू झाल्याची माहिती मिळताच डोंबिवली मोठागाव, कोपर भागातील वाळू व्यावसायिक बोटी घेऊन खाडीतून पळून गेले.

## तरुणीचे हत्या प्रकरण, मारेकऱ्याला आजन्म कारावास

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

ठाण्यातील एका तरुणीच्या हत्या प्रकरणी मारेकरी आकाश पवार याला ठाणे न्यायालयाने आजन्म कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा



सुनावली आहे. २०१८ मध्ये एकतर्फी प्रेमातून आकाश पवार याने भररस्त्यात तरुणीची चाकूने हल्ला करून हत्या केली होती.

ठाण्यातील एका महाविद्यालयात तरुणी शिकत होती. ४ ऑगस्ट २०१८ या दिवशी सकाळी ११ वाजता ती पूर्व द्रुतगती महामार्गावरून जात असताना आकाश पवार याने तिला भर रस्त्यात गाठले. आकाश पवार हा तिच्यावर एकतर्फी प्रेम करत होता. त्यास नकार दिल्याने आकाश याने तिच्यावर चाकूने हल्ला करत तिची हत्या केली होती. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आकाश पवार याला पोलिसांनी अटक केली होती. त्याच्या विरोधात ठाणे सत्र न्यायालयात ३१ अक्टोबर २०१८ मध्ये नौपाडा पोलिसांनी शवविच्छेदन आहवाल, साक्षीदार यांचे जबाब, प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवून न्यायालयात आरोप पत्र सादर करण्यात आले.

## अतिक्रमण कारवाईत दुजाभाव?

**■ बदलापूर : सचिन कदम**

बदलापूर येथील पूर्व भागात कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने शुक्रवारी काही ठिकाणी फेरीवाल्यांवर कारवाई केली. मात्र या फेरीवाल्यांवर कारवाई करत असतानाच काही बड्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करून उभारलेल्या खाद्य पदार्थांच्या स्टॉल्सला या कारवाईतून वगळल्याने नगरपरिषदेच्या कारवाई बाबत सर्वत्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

बदलापूर शहरातील खाद्य पदार्थांच्या गाडीवरील सिलिंडरचा स्फोट झाल्याने अनधिकृत पद्धतीने शहरात ठिकठिकाणी थाटण्यात आलेल्या फेरीवाल्यांच्या स्टॉल्सचा प्रश्न ऐरणीवर आला. यानंतर जागे झालेल्या कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा



उचलण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी नगर परिषदेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बदलापूर पूर्व भागात स्टेशन ते कात्रप परिसरात कारवाई करून काही फेरीवाल्यांना तेथून हटविले. मात्र ही कारवाई करताना शहरातील घोरपडे चौकात एका मिठाईच्या दुकानासमोर थाटलेल्या सात ते आठ स्टॉलला या कारवाईतून वगळण्यात आले. यामुळे अतिक्रमण विभागाकडून कारवाईत दुजाभाव केला जात असल्याच्या सर्वत्र चर्चा रंगू लागल्या. यानंतर नगर परिषदेची ही कारवाई दुटप्पी असल्याचा आरोप फेरीवाला संघटनेचे निलेश येलवे यांनी केला. फेरीवाल्यांसह नगर परिषद कार्यालयात येऊन त्यांनी मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. दिलेल्या आश्वासनाप्रमाणे फेरीवाल्यांना फेरीवाला क्षेत्र उपलब्ध करून न देता कारवाई केल्यास मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला. सद्यस्थितीत बदलापुरात शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत पद्धतीने फेरीवाल्यांकडून खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. यामुळे नागरिकांना सातत्याने वाहतूक कोंडीला देखील सामोरे जावे लागते.

## २९ गावांच्या हरकतींवरील सुनावणीला ग्रामस्थांचा विरोध; जिल्हाधिकाऱ्यांना बजावली नोटीस

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई विरार महापालिकेत २९ गावे समाविष्ट करण्याच्या निर्णयावरील हरकतींच्या सुनावणी प्रक्रियेला सोमवार पासून सुरूवात होत आहे. मात्र ही सुनावणी बेकायदेशीर असून या सुनावणीवर बहिष्कार टाकला आहे. तिला कुठला संवैधानिक अधिकात नसल्याचा आरोप करत गाव बवाच समितीने थेट पालघर जिल्हाधिकाऱ्यांनाच नोटीस बजावली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेमधील ५५ गावांपैकी वगळलेली २९ गावे महानगरपालिका हद्दीत पुनश्चः समाविष्ट करण्याबाबत १४ फेब्रुवारी रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. गावांचा महापालिकेत समावेश केल्यांतर १४ फेब्रुवारी २०२४ ते १४ मार्च २०२४ या कालावधीत ३१ हजार ३८९ हरकती आणि सूचना आल्या होत्या. त्यात गावे महापालिकेतून वगळू नयेत यासाठी ११ हजार ५९१ तर वगळण्यात यावीत यसाठी १९ हजार ७९८ अर्ज प्राप्त झाले होते. या हरकती आणि सूचनांवर पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात उद्यापासून (१६ डिसेंबर) २० डिसेंबरपर्यंत सुनावणी घेतली जाणार आहे. त्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. मात्र ही सुनावणी बेकायदेशीर असल्याचा आरोप गाव बचाव आंदोलकांनी केला आहे. गावांचा महापालिकेत समावेश करण्यासाठी स्थानिक प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात नाही. त्यामुळे ही सुनावणी घेता येऊ शकत नाही असा दावा आंदोलकांनी




केला आहे. ही सुनावणी घेत असल्याबद्दल गाव बचाओ समितीच्या वतीने ॲड सुमित डोंगरे थेट जिल्हाधिकाऱ्यांना वकिलामार्फत नोटीस बजावून प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी केली आहे. ३५ पैकी १३ गावे पेसा कायद्याअंतर्गत अधिसुचित आहेत. त्यामुळे त्यांचा महापालिकेत समावेश होऊच शकत असे आंदोलकांचे नेते विजय पाटील यांनी सांगितले. गाव बचाव आंदोलकांच्या वतीने विजय पाटील, जॉन परेरा, डॉ मानिका डाबरे, मिलिंद खानोलकर, विनायक निकम, पायस मच्याडो, कुमार राऊत आदी विविध कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांची भेट घेऊन ही सुनावणी रद्द करण्याची मागणी केली. डॉ मनिका डाबरे आणि विनायक निकम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेल्या नोटिसित उपस्थित केलेल्या मुद्यांच्या आधारे विभागीय आयुक्तांना अहवाल पाठविण्यास सांगितले आहे. तो पर्यंत प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी केली आहे. सुनावणी घेणार कशी? ही सुनावणी हेतुपूर्वक पालघर येथे ठेवली आहे, हे जाणूनबुजून केलेलं कारस्थान आहे ज्यामुळे लोक सुनावणी – हरकतीसाठी पोहचणार नाहीत, असा आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. वसई ते पालघर हे अंतर किमान ७० किमी दूर आहे. एकूण ३१ हजार हरकती असून दिवसाला सरासरी ९ हजार असे ३१ हजार लोक कसे पोहचणार? वसईत इतक्या सरकारी इमारती, शाळा असताना इतक्या दूर सुनावणी का? असा सवालही पर्यावरणवादी कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांनी आहे.

# द. कोरियाच्या अध्यक्षांविरोधात महाभियोग मंजूर

**सेऊल : वृत्तसंस्था**

दक्षिण कोरियाच्या 'नॅशनल असेंब्ली' या सर्वोच्च कायदेमंडळात शनिवारी अध्यक्ष यून सुक येओल यांच्याविरोधात महाभियोगाचा ठराव मंजूर झाला. पार्लमेंटच्या निर्णयानंतर यून येओल यांनी आपल्याविरोधातील निर्णयाला कॉन्स्टिट्युशनल कोर्टात आव्हान देण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, त्यांच्याविरोधात महाभियोग मंजूर झाल्याचे वृत्त प्रसारित झाल्यानंतर नागरिकांनी सेऊलच्या रस्त्यांवर उतरून जल्लोष साजरा केला. 'नॅशनल असेंब्ली'त २०४ विरुद्ध ८५ अशा बहुमताने महाभियोग ठराव मंजूर झाल्यानंतर, यून येओल यांचे सर्व अधिकार आणि कर्तव्ये स्थगित झाले आहेत. त्यांचे अधिकार व कर्तव्ये आता ते सत्तारचनेत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या पंतप्रधान हान डक-सू यांच्याकडे देण्यात आले आहेत. यून येओल यांनी ३ डिसेंबरला अचानक 'मार्शल लॉ' लागू करत देशात



आणीबाणी लागू केली होती. मात्र, त्यानंतर काहीच तासांनी 'नॅशनल असेंब्ली'ने मार्शल लॉ विरोधात मतदान केल्याने यून यांना आपला निर्णय मागे घ्यावा लागला होता. त्याविरोधात पहिल्यांदा ७ डिसेंबरला यून यांच्याविरोधात महाभियोगाचा ठराव मांडण्यात आला होता. त्यावेळी यून यांच्या 'पीपल पॉवर पार्टी'च्या बहुसंख्य सदस्यांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. मात्र, नागरिकांमध्ये यून यांच्याविरोधातील रोष आणि संताप विचारात घेऊन, तसेच त्यांच्याविरोधात केली जाणारी निदर्शने पाहता 'पीपीपी'च्या सदस्यांनी दुसऱ्यांदा मांडल्या जाणाऱ्या महाभियोगावर मतदानामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. यून यांना अध्यक्षपदावरून बडतर्फ करायचे की त्यांना ते पुन्हा बहल करायचे यावर 'कॉन्स्टिट्युशनल कोर्टा'ने १८० दिवसांच्या आत निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यावेळी त्यांच्या विरोधात निकाल लागल्यास, त्यांचा वारसदार निवडण्यासाठी ६० दिवसांच्या आत राष्ट्रीय निवडणूक घेणे बंधनकारक असेल.

# अतुल सुभाष यांच्यानंतर पोलीस शिपायाची वर्दीमध्येच आत्महत्या; पत्नी-सासऱ्याच्या छळाला कंटाळून उचलले टोकाचे पाऊल

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूतील अभियंता अतुल सुभाष यांनी काही दिवसांपूर्वीच (९ डिसेंबर) पत्नी आणि सासरच्या नातेवाईकांना कंटाळून आत्महत्या केली. त्यानंतर महिलांच्या बाजूने असलेल्या कायद्यांवर जोरदार टीका होऊ लागली. आता पुन्हा एकदा बंगळुरूतच एका पोलीस शिपायाने पत्नी आणि सासऱ्यांना कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आत्महत्या केलेल्या पोलीस शिपायाचे नाव एचसी थिपन्ना (वय ३४) असल्याचे समजते. बंगळुरूच्या हुलिमावु वाहतूक पोलीस ठाण्यात ते वरिष्ठ शिपाई म्हणून काम करत होते.

हीलालिगे रेल्वे स्थानक येथे शुक्रवारी रात्री थिपन्ना यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. रेल्वे पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.



थिपन्ना यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये पत्नी आणि सासऱ्यांवर आरोप केले आहेत. त्यांच्या छळाला कंटाळूनच आपण आत्महत्यासारखा टोकाचा निर्णय घेतला, असे या चिठ्ठीत लिहिण्यात आले आहे. पत्नी आणि सासऱ्यांनी आपल्या जीविताला धोका निर्माण केला होता, असेही थिपन्ना यांनी चिठ्ठीत लिहिले आहे.

थिपन्ना यांनी लिहिले की, १२ डिसेंबर रोजी सासरे यमुनप्पा यांनी सायंकाळी ७.२६ वाजता मला फोन केला तब्बल १४ मिनिटांच्या कॉलमध्ये त्यांनी मला धमकी दिली. तसेच दुसऱ्या दिवशी मी जेव्हा त्यांना भेटायला गेलो, तेव्हा त्यांनी माझ्या मरणाची अपेक्षा व्यक्त केली. मी मेलो तरी त्यांची मुलगी माझ्याशिवाय आनंदी राहू शकेल, असे बोलून त्यांनी माझ्याशी गैरवर्तन केले. सुसाईड नोटच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३५१(३) आणि कलम ३५२ नुसार गुन्हा दाखल केला.

बंगळुरूमधील ऑटोमोबाइल कंपनीत वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या ३४ वर्षीय अतुल सुभाष यांनी पत्नी आणि सासरच्या लोकांच्या त्रासाला कंटाळून सोमवारी (९ डिसेंबर) आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी ८१ मिनिटांचा व्हिडीओ रेकॉर्ड केला असून २४ पानांची सुसाइड नोट लिहिली आहे. या नोटमध्ये त्यांनी आपल्या शेवटच्या १२ इच्छा व्यक्त केल्या आहेत. अतुल सुभाष यांच्यावर त्यांच्या पत्नीने नऊ गुन्हे दाखल केले होते. न्यायालयीन प्रक्रियेला कंटाळून अतुल सुभाष यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जाते.

# पंतप्रधान मोदी यांच्याकडून 'अक्षयवट'ची पूजा, महाकुंभमेळ्यानिमित्त विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन

**महाकुंभ नगर : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभ-२०२५ चे आयोजन, वैश्विक कल्याण, विश्वशांती आणि तीर्थक्षेत्र प्रयागराज येथे येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी 'अक्षयवट' येथे पूजाअर्चा केली. पंतप्रधानांच्या हस्ते या वेळी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्रिवेणी संगम येथे पूजा केली. येथील आरतीमध्येही ते सहभागी झाले. संगम नोज येथे पंतप्रधानांनी बोटीतून प्रवास केला आणि विकासकामांचा आढावा घेतला. पंतप्रधानांनी प्रमुख मंदिर कॉरिडॉरचे उद्घाटन केले, ज्यात भारद्वाज आश्रम कॉरिडॉर, श्रृंगवरपूर धाम कॉरिडॉर, अक्षयवट कॉरिडॉर आणि हनुमान मंदिर कॉरिडॉर



प्रयागराज येथे महाकुंभनिमित्ताने तयार करण्यात आलेल्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले. संगम नोज येथे पूजा व अभिषेक केल्यानंतर पंतप्रधानांनी अक्षयवट वृक्षाचे दर्शन घेतले. महाकुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी आणि विश्वकल्याणासाठी मोदींनी प्रार्थना केली आणि अक्षयवट वृक्षाला प्रदक्षिणा घातली. त्यानंतर हनुमान मंदिर आणि सरस्वती कूप येथे दर्शन घेतले आणि पूजा केली. पंतप्रधान मोदी यांचा समावेश आहे. महाकुंभमेळा पंतप्रधानांच्या प्रेरणेने भव्य, दिव्य आणि डिजिटल स्वरूपात उत्सवात साजरा करण्यात येईल, असे योगी आदित्यनाथ यांनी या वेळी सांगितले. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन मेहता, उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य, ब्रजेश पाठक आणि मुख्य सचिव मनोज कुमार सिंह यावेळी उपस्थित होते. प्रयागराज येथे महाकुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीपर्यंत साजरा केला जाणार आहे.

# काँग्रेसला संविधान खिशात टाकण्याचीच सवय, संविधानावरील चर्चेत राजनाथ सिंह यांचा थेट प्रहार

**नवी दिल्ली : प्रगती शर्मा**

काँग्रेसचे नेते खिशात संविधानाची प्रत घेऊन हिंडत आहेत, त्यांना संविधान खिशात टाकून फिरायचीच सवय आहे. लहानपणापासून हीच शिकवण दिलेली असते. संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना हरताळ फासण्याचे काम काँग्रेसनेच केले आहे. पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी संविधानाचा मूळ ढाचा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. आता हेच काँग्रेसचे नेते संविधानाच्या रक्षणाचे धडे देत आहेत, अशा शेलकी शब्दांत केंद्रीय संरक्षणमंत्री व लोकसभेचे उपनेते राजनाथ सिंह यांनी काँग्रेसच्या 'संविधान बचाओ' आंदोलनाचे वाभाडे काढले.

संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासानिमित्त सलग दोन दिवस संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये संविधानावर चर्चा केली असून शुक्रवारी भाजपच्या वतीने राजनाथ सिंह यांनी चर्चेची सुरुवात केली. संसदेवर झालेल्या हल्ल्याला २३ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शहीद जवानांना आदरांजली वाहिली. त्यानंतर राजनाथ सिंह यांनी सुमारे दीड तासाच्या भाषणामध्ये काँग्रेसने संविधान बदलण्याच्या कथित प्रयत्नांचा पाढा वाचला! जेव्हा जेव्हा सत्ता आणि संविधान यांच्यामध्ये एकाची निवड करण्याची वेळा आली तेव्हा काँग्रेसने सत्तेला प्राधान्य दिले. नेहरूंनी १७, इंदिरा गांधींनी २८, राजीव गांधींनी १०, तर मनमोहन सिंग यांनी संविधानामध्ये सात दुरुस्त्या केल्या. काँग्रेसने संविधानामध्ये केवळ दुरुस्त्याच केल्या नाहीत तर ते हळूहळू बदलण्याचा



प्रयत्न केला, अशी टीका त्यांनी केली. १९७६ मध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश एच. आर. खन्ना यांनी काँग्रेस सरकारच्या विरोधात निकाल दिल्यामुळे ते सरन्यायाधीश होऊ शकले नाहीत, असे खन्नांचे म्हणणे होते, याचा उल्लेख राजनाथ यांनी केला. शाहबानो प्रकरणाचा संदर्भ देत राजनाथ म्हणाले की, आता 'मोहब्बत की दुकान' म्हणणाऱ्या या काँग्रेस नेत्यांकडे बघून हसू येते!

काँग्रेसने संविधानाला कधीच महत्त्व दिले नाही असे सांगताना राजनाथ यांनी अनेक उदाहरणे दिली. तीन वरिष्ठ न्यायाधीशांना डावलून इंदिरा गांधींनी चौथ्या क्रमांकावरील न्यायाधीशाला सरन्यायाधीश केले. वेळोवेळी काँग्रेसने संविधानाचा अपमान केला आहे. डॉ. आंबेडकरांनी काँग्रेसच्या संविधानाची मूल्ये पायदळी तुडवण्याच्या वृत्तीचा विरोध केला होता, पण काँग्रेसने हीच परंपरा पुढेही चालू ठेवली. नेहरूंनी समान नागरी कायद्याला विरोध केला. इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली, त्यांनीच ५० वेळा राज्य सरकारे बरखास्त केली. पण हेच काँग्रेस नेते संविधान धोक्यात असल्याचा आक्रोश करत आहेत, असा आक्रमक प्रहार राजनाथ यांनी केला. जम्मू-काश्मीरसारख्या जिथे संविधान लागू होत नव्हेत तिथेही ते लागू केले. जीएसटीसारखा कायदा केला. नारीशक्तीचा कायदा करून महिलांचे सशक्तीकरण केले. राष्ट्रीय मागास आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. देशाच्या अखंडत्वासाठी, सामाजिक-आर्थिक विकासासाठी संविधानामध्ये योग्य दुरुस्त्या केल्या. भाजपने संविधानाचा नेहमीच सन्मान केला. धर्माचे अनेक अर्थ आहेत, त्यातील महत्त्वाचा अर्थ म्हणजे कर्तव्य. भाजपने संविधानरक्षणाचो कर्तव्य बजावले आहे. संविधान भाजपसाठी पवित्र ग्रंथ आहे, असे राजनाथ म्हणाले.

# परभणी दगडफेक प्रकरणातील तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू; प्रकाश आंबेडकरांनी व्यक्त केला संताप

**परभणी : गणेश बागडे**

परभणी येथील स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्याचा प्रकार समोर आला होता. याच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदला हिंसक वळण लागले. शहरातील काही दुकाने आणि वाहनांवर दगडफेकीच्या घटना घडल्या. संतप्त जमावाने एसटी बसवरही दगडफेक केली होती. दरम्यान आता या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याबद्दल सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे.

मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सोमनाथ सुर्यवंशी असून प्रकाश आंबेडकरांनी त्याच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत की, 'परभणीत वडार समाजातील भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा कोठडीत मृत्यू झाला आहे, हे अत्यंत वेदनादायक, भयानक आणि असह्य करणारे आहे. त्यांचा जामीन अर्ज मंजूर होऊनही न्यायालयीन कोठडीतच त्यांचा मृत्यू झाला, याहून असहनीय काय असेल!'पुढे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं की, 'त्यांचा (सोमनाथ



सुर्यवंशी) मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला असल्याने, आमचे वकील न्यायालयाला विनंती करतील की पोस्टमॉर्टम (सीटी स्कॅन, एमआरआय, फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजिकल) फॉरेन्सिक विभाग असलेल्या सरकारी रुग्णालयामध्ये केले जावे आणि फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजी या दोन्ही विभागांकडून पोस्टमॉर्टमचे चित्रीकरण केले जावे'. याबरोबरच प्रकाश आंबेडकर यांनी 'आम्ही न्यायासाठी लढू!', असेही म्हटले आहे.

वंचित बहुजन आघाडीने सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर काल एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या पोस्टमधून परभणी पोलीसांनी दलित महिलेला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.


'व्हिडीओमध्ये रुग्णालयात दाखल दलित महिलेला परभणी पोलिसांनी बेदम मारहाण केली. पोलीसांनी तिच्या मांड्या आणि पोटावर उभे राहून तिच्या डोक्यावर व हातावर लाठ्या मारल्या. तिला शौचालय वापरायचे आहे असे तिने म्हटल्यावर पोलीसांनी तिचे पाय पसरले आणि तिच्या पायांवर मारले.तिचा एक हात फ्रॅक्चर झाला असून, तिच्या डोक्याला झालेल्या जखमांसाठी तिला सीटी स्कॅन करावे लागेल', असे सांगण्यात आले.

# 'एक देश, एक निवडणूक' झाल्यास पैसे किती वाचतील? रामनाथ कोविंद यांनी दिली महत्त्वाची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबवण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर १२ डिसेंबर रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली असून येत्या काही दिवसात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे. यादरम्यान माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांनी देशात एकाच वेळी निवडणुका घेण्याची संकल्पना ही भारताच्या निवडणुकींच्या इतिहासात रुजलेली आहे असे म्हटले आहे.

कोविंद यांनी मतदार त्यांचे मत हे प्रशासनाला लक्षात घेऊन करत असतात, सरकार निवडणुकींमध्ये गुंतलेले राहिल या अपेक्षेने नाही, असा युक्तीवाद देखील 'एक देश, एक निवडणूर्कक्ष८२१७;चे महत्व पटवून देताना केला. सतत होणाऱ्या निवडणुकांचा प्रशासनावर काय परिणाम होते हे दाखवून देण्यासाठी कोविंद यांनी राजस्थान येथील उदाहरण दिले. '२०२३ च्या अखेरपर्यंत राजस्थानमध्ये विधानसभा निवडणूक झाली आणि नवीन सरकारने कार्यभार स्वीकारला. नोकरशाहीमध्ये बदल करण्यात आले आणि लोक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी सरकारकडे जाऊ लागले. पण सत्तेत आलेल्यांचे उत्तर होते की लोकसभा निवडणूक पार पडेपर्यंत



वाट पाहा. हे चक्र जुलै २०२४ मध्ये संपले. २०२६ च्या सुरुवातीला पंचायत निवडणूक सुरू होईल. त्यानंतर सर्व लक्ष हे पुढील विधानसभेची निवडणूक २०२८ वर केंद्रीत केले जाईल. या प्रक्रियेत निवडणुकीत अनेक वर्षे वाया घालवले जातात',

असे मत कोविंद यांनी व्यक्त केले. कोविंद म्हणाले की एकत्र निवडणुकीची संकल्पना ही १९५२ आणि १९६७ साली घेण्यात आलेल्या निवडणुकींपासूनची आहे. 'तेव्हा लोकसभा आणि विधानसभा निवडणुका या एकत्र झाल्या होत्या. पुढे अडचणी आल्या आणि प्रक्रिया बदलली', असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कोविंद म्हणाले की एक देश, एक निवडणूक या संकल्पनेबद्दल सध्या सुरू असलेल्या चर्चांमध्ये अने गैरसमज दिसून येतात. त्यांनी सांगितलं की, 'आज अस्तित्वात असलेले संविधान अनेक निवडणुकींना परवानगी देते. पण मी ज्यांच्याशी बोललो अशा अनेकांनी लक्षात आणून दिलं आहे की प्रत्येक पाच वर्षांच्या काळात चार वर्षे ही निवडणूक प्रक्रियेत घालवली जातात'. रामनाथ कोविंद यांनी सांगितले की, त्यांनी ज्या समितीचे नेतृत्व केले त्यामध्ये अर्थतज्ज्ञ एन. के सिंग यांचादेखील समावेश होता. त्यांनी भारतील निवडणुकींसाठी येणाऱ्या खर्चाच्या अभ्यासासाठी एक गट स्थापन केला होता. सध्या निवडणुकींसाठी ५ ते ५.५ लाख कोटी रूपयांचा खर्च येतो.

# कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणातील दोन आरोपींना जामीन, सीबीआयकडून चार्जशीट दाखल नसल्याने निर्णय

**कोलकाता : वृत्तसंस्था**

कोलकाता येथील आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयात एका ट्रेनी डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. ऑगस्ट महिन्यात हे प्रकरण घडलं होतं. जे देशभरात चर्चेत राहिलं. या प्रकरणातल्या दोन आरोपींना जामीन मंजूर करण्यात आला आहे. सीबीआय चार्जशीट दाखल करण्यात अपयशी ठरल्याने सेलदाह येथील न्यायालयाने दोन आरोपींना जामीन मंजूर केला आहे. सेलदाह न्यायालयाने महाविद्यालयाचा माजी प्राचार्य संदीप घोष आणि ताला पोलीस स्टेशनचा माजी पोलीस अधिकारी अभिजित मोंडोल या दोघांना जामीन मंजूर केला आहे. सीबीआय आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील ट्रेनी डॉक्टरच्या



बलात्कार आणि हत्या प्रकरणात चार्जशीट दाखल करण्यात ९० दिवस उलटून गेल्यावरही अपयशी ठरलं त्यामुळे हा जामीन मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना सेलदाह न्यायलायने २ हजार रुपयांच्या जातमुचल्यावर जामीन मंजूर केला आहे. सीबीआयने चौकशीसाठी बोलवल्यानंतर या दोघांनाही चौकशीसाठी यावं लागेल या अटीवरच जामीन मंजूर करण्यात आला आहे. संदीप घोषला या प्रकरणात जामीन मिळाला असला तरीही तो तुरुंगातच राहणार आहे. कारण आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील आर्थिक गैरव्यहार प्रकरणात त्याला जामीन मिळालेला नाही. कोलकाता येथील ट्रेनी महिला डॉक्टरवर बलात्कार करुन तिची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश हादरला होता.

# एकट्या महिला एकट्या पुरुषांपेक्षा जास्त सुखी; नव्या अभ्यासातील निष्कर्ष चर्चेत!

**नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी**

मानवी मनाचा ठाव अद्याप कुणालाही लागलेला नाही असं म्हणतात. पण असं असलं तरी तसं करण्याचे प्रयत्न मात्र अविरतपणे चालूच असतात. अशाच एका प्रयत्नाचा भाग म्हणून करण्यात आलेल्या एका अभ्यासातून समोर आलेला एक निष्कर्ष सध्या चर्चेत आहे. या निष्कर्षानुसार, एकट्या राहणाऱ्या पुरुषांपेक्षा एकट्या राहणाऱ्या महिला या अधिक सुखी, आनंदी, समाधानी असतात. या निष्कर्षावर संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असून अनेकजण यावर आपापली मतं मांडताना दिसत आहेत.

'सोशल सायकोलॉजिकल अँड पर्सनॅलिटी सायन्स'मध्ये हा शोधनिबंध प्रकाशित झाला असून हिंदुस्तान टाईम्सनं त्याबाबतचं सविस्तर वृत्त दिलं आहे. सेज जर्नल्स पब्लिकेशनमध्येही हा शोधनिबंध प्रकाशित करण्यात आला आहे. एलेन होआन आणि जेफ मॅकडोनाल्ड यांनी हे संशोधन केलं आहे. त्यांच्यामते आयुष्याच्या सर्वच भागांमध्ये एकट्या राहणाऱ्या महिला या एकट्या राहणाऱ्या पुरुषांपेक्षा जास्त समाधानी व आनंदी असतात. आत्तापर्यंत प्रामुख्याने दाम्पत्यांच्या मानसिकतेवरच संशोधन झालेलं असताना एकट्याने राहणाऱ्या व्यक्तींवर झालेलं हे संशोधन दुर्मिळ असल्याचं मानलं जातं. रिलेशनशिप स्टेटस सिंगल ठेवण्याचं वाढतं प्रमाण या प्रकारच्या व्यक्तींच्या



अभ्यासासाठी प्रेरक ठरल्याचंही या संशोधनात नमूद करण्यात आलं आहे. या संशोधनासाठी २०२० ते २०२३ या काळातील १० वेगवेगळ्या प्रकारच्या संशोधनांसाठी करण्यात आलेल्या अभ्यासाच्या आधारे माहिती घेऊन हा शोधनिबंध तयार करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी ५९४१ प्रयुक्तांनी (संशोधनातील सहभागी व्यक्ती) सहभाग घेतला होता. हे प्रयुक्त अभ्यास केला त्यावेळी 'सिंगल' होते. यात समान संख्येनं पुरुष आणि महिला होत्या. या सहभागी व्यक्तींचं वय साधारण १८ वर्षे ते ७५ वर्षे यादरम्यान होतं. त्यांचं सरासरी वय ३१.७ वर्षे इतकं होतं. प्रश्नावली आणि दिलेली उत्तरे!

या सर्व व्यक्तींन देण्यात आलेल्या प्रश्नावलीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या प्रश्नांचा समावेश होता. त्यामध्ये त्यांचं रिलेशनशिप स्टेटस, सामान्यपणे जीवनमानाचा दर्जा, त्यातलं समाधान, लैंगिक सुख, जोडीदाराविषयीच्या अपेक्षा अशा प्रकारचे प्रश्न विचारण्यात आले होते. यातून आलेल्या उत्तरांचा सांख्यिक पद्धतीने अभ्यास करून त्यावर आधारित निष्कर्ष काढण्यात आले.

# ‘एकलव्य अन् त्याच्या अंगठ्याप्रमाणेच....’; संविधानावरील चर्चेत राहुल गांधींनी मांडले महत्त्वाचे निरीक्षण

■ **नवी दिल्ली : प्रगती शर्मा**

राहुल गांधी आणि काँग्रेस मागील काही काळापासून सामाजिक न्यायाची भाषा बोलताना दिसत आहेत. सर्व जातींना समान प्रतिनिधित्व देण्याच्या मुद्यापासून ते देशव्यापी जातीनिहाय जनगणनेची मागणी इथपर्यंत हा प्रवास राहिला आहे. यादरम्यान राहुल गांधी यांनी शनिवारी ‘खालच्या जातीचा’ मानल्या जाणाऱ्या महाभारतामधील एकलव्याचा उल्लेख करत या चर्चेला आणखी एक पदर जोडला आहे. भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासावरील चर्चेत राहुल गांधी सहभागी झाले. यावेळी केलेल्या भाषणात राहुल गांधी म्हणाले की, ‘सावरकर यांनी भाष्य केले होते की, भारतीय संविधानाबाबत सर्वात वाईट गोष्ट म्हणजे यात काहीही भारतीय नाही. हिंदू राष्ट्रात वेदानंतर मनुस्मृती हा सर्वात पूजनीय असा धर्मग्रंथ आहे. या ग्रंथाने अनेक शतकांपासून देशाच्या आध्यात्मिक आणि दैवी मार्गाचे संहिताकरण केले आहे. आजही मनुस्मृती हा कायदा आहे.’ पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की ,’सावरकरांची इच्छा होती की भारत ज्या पुस्तकाच्या आधारावर चालवला जाईल ते पुस्तक हे (मनुस्मृती) असावे आणि याच गोष्टीसाठी संघर्ष (भाजपा आणि विरोधक यांच्यात) सुरू आहे’.

महत्वाची बाब म्हणजे दलित कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायासाठी लढणारे मनुस्मृतीला राज्यघटनेच्या विचारांच्या विरोधी मानतात. तसेच त्यांचे म्हणणे आहे की, त्या मार्गाने गेल्यास दलित, आदिवासी, महिला आणि मागास समाजातील लोकांना दुय्यम दर्जाचे नागरिक ठरतात. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी सवाल केला की, सावरकरांनी जे काही म्हटलंय त्याला भाजपाचा पाठिंबा आहे का?. ते म्हणाले की, ‘तुम्ही तुमच्या नेत्याच्या शब्दांना पाठिंबा देता का? कारण जेव्हा तुम्ही संसदेत संविधान रक्षणाबद्दल बोलता तेव्हा तुम्ही सावरकरांची विटंबना करता, त्यांचा अपमान आणि बदनामी करता’. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी हे यापूर्वीही सावरकरांविषयी बोलले आहेत, मात्र यावेळी त्यांच्या भाषणात



एकलव्यावर देण्यात आलेला जोर लक्षणीय होता. राहुल गांधी यांनी त्यांच्या भाषणात राज घराण्यातील पांडवांचे गुरू द्रोणाचार्य यांनी एकलव्याचा शिष्य म्हणून स्वीकार करण्यास नकार दिला, कारण तो खालच्या निषाद जातीत जन्मला होता, याबद्दल विस्ताराने माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, द्रोणाचार्य यांचा मातीचा पुतळा बनवून एकलव्यने कशा प्रकारे स्वत:ला धनुर्विद्या शिकवली आणि त्यानंतर द्रोणाचार्य यांनी त्याला पुन्हा धनुष्यबाण पकडता येऊ नये म्हणून, गुरूदक्षिणेमध्ये त्याचा अंगठा मागितला. गांधी म्हणाले की, अशाच प्रकारे नरेंद्र मोदी सरकार हे मागे पडलेल्या तरुणांचं कौशल्य हिरावून घेण्यासाठी त्यांचा उजवा अंगठा कापत आहेत . ते म्हणाले की ‘जसे द्रोणाचार्यांनी एकलव्याचा अंगठा कापला, त्याच प्रकारे तुम्ही भारतातील तरुणांचे अंगठे कापत आहात.’ पुढे राहुल गांधी यांनी याची तुलना मोदी सरकार अदाणी समूहाबद्दल पक्षपातीपणाची भूमिका घेत असल्याशी केली.

तसेच त्यांनी हे उदाहरण सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण डावलून होणारी लॅटरल ट्री , संरक्षण दलांसाठी अग्निपथ भरती योजना यांच्या माध्यमातून भारतातील तरुण, मागस आणि गरिबांचे खच्चीकरण होत असल्याशी जोडले. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणना आणि आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा काढून टाकण्याचा पुनरुच्चार केला.

# ‘एक दिल्ली का बेटा, दो सीएम के बेटे’, केजरीवालांसमोर दोन माजी मुख्यमंत्र्यांच्या मुलांचे आव्हान

■ **नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी येत्या काही दिवसांत बिगूल वाजणार आहे. यासाठी सत्ताधारी आम आदमी पार्टीसह भाजपा आणि काँग्रेसनेही जोरदार तयारी केली आहे. गेल्या वेळी विजयाची हॅट्रीक करणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्यासमोर यावेळी सत्ता राखण्याचे आव्हान तर आहेच. पण, यावेळी त्यांना नवी दिल्ली मतदारसंघात माजी मुख्यमंत्री शीला दिक्षित यांचे पुत्र संदीप दिक्षित आणि दुसरे माजी मुख्यमंत्री साहेब सिंग वर्मा यांचे पुत्र परवेश वर्मा यांच्याशी सामना करावा लागणार आहे.

रविवारी आम आदमी पार्टीने त्यांची शेवटची उमेदवारी यादी जाहीर केली. यामध्ये पक्षाने नवी दिल्ली मतदारसंघातून माजी



मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे येथून काँग्रेसने माजी मुख्यमंत्री शीला दिक्षित यांचे चिरंजीव संदीप दिक्षित यांना तिकिट दिले आहे. तर भाजपाने त्यांचे उमेदवार अद्याप जाहीर केले नसले तरी, पक्षाने परवेश वर्मा यांना या मतदारसंघातून मैदानात उतरवण्याची तयारी केली आहे. परवेश वर्मा हे माजी मुख्यमंत्री साहेब सिंग वर्मा यांचे पुत्र आहेत. नवी दिल्ली मतदारसंघा राजकीयदृष्ट्या सर्वात महत्त्वाचा मानला जातो. कारणे याच मतदारसंघात संसद भवन आहे. त्याचबरोबर येथे परदेशी मिशन आणि अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आहेत. या मतदारसंघाने आतापर्यंत अनेकांना मुख्यमंत्री म्हणून पाठवले आहे. हा विधानसभा मतदारसंघ २००८ मध्ये अस्तित्वात आला आहे. तर नवी दिल्ली लोकसभा मतदारसंघ १९५१ पासून अस्तित्वात आहे. आम आदमी पार्टीतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्ष लवकरच ‘एक दिल्ली का बेटा और दो सीएम के बेटे’ अशी प्रचार मोहिम सुरू करणार आहे. सूत्रांनी सांगितले की, ‘केजरीवाल आठवड्याचे शेवटचे दिवस त्यांच्या मतदारसंघासाठी राखीव ठेवून मतदारांशी संपर्कात असतात. केजरीवाल जेव्हा शक्य असेल तेव्हा मतदारसंघातील वाढदिवस, लग्न आणि स्थानिक क्रीडा स्पर्धा यासारख्या कार्यक्रमांनाही उपस्थित राहतात. २०१३ मध्ये ते पहिल्यांदा निवडून आल्यापासून, ते म्हणतात की, या लोकांनीच मला विजयी केले आहे.’ २०१३ पासून केजरीवाल यांनी या जागेवर पकड निर्माण केली आहे. त्यांच्या पदार्पणाच्या निवडणुकीत, त्यांनी शीला दीक्षित यांना पराभूत करत ५४ टक्के मते मिळविली होती. तर दोन वर्षांनंतर मुदतपूर्व निवडणुकीत त्यांनी ६४ टक्के मते मिळवून काँग्रेसच्या किरण वालिया आणि भाजपच्या नुपूर शर्मा यांचा पराभव केला होता.

# उत्तर प्रदेशच्या संभलमध्ये ४ मशिदी अन् १ मदरशातून १.३ कोटी रुपयांची वीजचोरी!

■ **लखनऊ : विशेष प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशमधील संभलमधील दोन भागांमध्ये वीज वितरणामधील अनियमितेचा तपास करण्यासाठी छापे टाकण्या आले होते. या कारवाईच्या दुसऱ्याच दिवशी (रविवार) गेल्या वर्षभरात या भागातील चार मशिदी आणि एका मदरशातून १.३ कोटी रुपयांची वीज चोरी करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

संभल प्रशासनाने जवळपास ५० वर्षांनंतर नुकतेच पुन्हा उघडलेल्या पुरातन मंदिराच्या जवळच या मशिदी आणि मदरसा आहे. जिल्हा प्रशासनाकडून वीजचोरीविरोधात चालवलेल्या मोहिमेदरम्यान हे मंदिर आढळून आल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. तसेच संभलचे जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र पेंसिया यांनी दावा केला की, शनिवारी पहाटे ५ वाजता लाऊडस्पीकर्सची तपासणी सुरू




असताना त्यांना या भागात वीज चोरी केली जात असल्याचे त्यांच्या लक्षात आले. संभलच्या दीपा सराई आणि नाई सराई या भागातदेखील पोलीस, जिल्हा प्रशासन आणि उत्तर प्रदेश वीज महामंडळ कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकाने दोन छापे टाकले होते. एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर माहिती दिली की, ‘दरवर्षी जवळपास ३०० कोटी रुपयांची वीज संभल नगर पालिका भागात पुरवली जाते. ज्यामध्ये लाईन लॉस हा ७२ टक्के इतका आहे. दीपा सराई आणि मिया सराई सारख्या भागात सर्वात जास्त (जवळपास ८५ टक्के) नुकसान होत आहे.’ सप्टेंबर महिन्यापासून या भागात वीजचोरी संबंधीत १,२५० एफआयआर दाखल झाल्या आहेत.

# ‘धनंजय चंद्रचूड यांच्यावर खटला दाखल व्हायला हवा’, ठाकरे गटाचे गंभीर आरोप; मोदींवरही टीकास्त्र

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासानिमित्त दोन्ही सभागृहांमध्ये संविधानावर चर्चा करण्यात आली. यादरम्यान सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप कले. या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील काल (१४ डिसेंबर) सहभाग घेतला. मोदींनी त्यांच्या भाषणात काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळालं. दरम्यान संविधानावर



देशातील राजकीय वर्तुळात सुरू असताना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. आमदार फोडणे तसेच विद्यमान मुख्यमंत्र्यांना तुरूंगात टाकणे हे कोणत्या संविधानात बसते? असा सवाल त्यांनी विचारला आहे. याबरोबरच राऊतांनी आमदार अपात्रता प्रकरणी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावरही गंभीर आरोप केले. संजय राऊत म्हणाले की, ‘विरोधी पक्षाला संसदीय लोकशाहीत महत्त्वाचं स्थान आहे, पण विरोधी पक्ष राहू नये यासाठी तपास यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावणे, विद्यमान मुख्यमंत्र्यांना तुरूंगात टाकणं हे कोणत्या संविधानात लिहिलं आहे?’ पुढे बोलताना राऊत म्हणाले की, ‘ईडी, सीबीआय कधी भाजपा नेत्याच्या घरी गेलीय हे दाखवावं. उलट आमच्याकडे असताना ज्यांच्या घरी गेली होती ते आज मोदींच्या मांडीवर बसले आहेत आणि मोदी त्यांना दूध पाजत आहेत. आईच्या ममतेने मोदी त्यांची काळजी घेत आहेत. ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा ज्यांच्यावर मोदींनी आरोप केला, त्यांना तुमच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री पदाची शपथ दिली जाते, हे कोणत्या संविधानात लिहीले आहे? हे सांगा.’ आमदार आपात्रता प्रकरणी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी मोदींच्या दबावाखाली निर्णय घेतला नाही असा आरोपही राऊतांनी केला आहे. ते म्हणाले की ‘ज्या पद्धतीने राज्यातील सरकारमधील आमदार फोडले, १०व्या शेड्यूलनुसार सगळे अपात्र ठरले पाहिजेत. मात्र नरेंद्र मोदी यांच्या दबावाखाली सर्वोच्च न्यायालयाने, चंद्रचूड यांनी निर्णय दिला नाही. हे काय संविधानात बसतं का? चंद्रचूड यांच्यावरती खरंतर खटला दाखल केला पाहिजे.’

‘ज्या पद्धतीने मोदी हे राज्य चालवत आहेत ते संविधानाच्या विरोधात आहे. संविधान हा देशाचा आधार आहे आणि तो आधार नरेंद्र मोदी यांनी उद्ध्वस्त केला आहे’, असेही राऊत यावेळी म्हणाले.

# दोन सत्ताकेंद्रे संकटाला आमंत्रण, जम्मू - काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची टीका



■ **नवी दिल्ली: वृत्तसंस्था**

केंद्रशासित प्रदेशातील दुहेरी सत्ताकेंद्र आपत्तीला आमंत्रण देणारे असतात, असे जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे. यासोबतच केंद्राला आश्वासनपूर्ती करणे आणि जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याचा पुनरुच्चारही केला. ऑक्टोबर महिन्यात पदभार स्वीकारल्यानंतर अब्दुल्ला यांनी निवडणूक प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेल्या वचनबद्धतेची आठवण करून दिली. सत्तेची दोन केंद्रे कधीच यशस्वी होत नाहीत, असेही ते म्हणाले. घटनेतील कलम ३७० रद्द केल्यानंतर ऑगस्ट २०१९ मध्ये संसदेच्या कायद्यानुसार जम्मू आणि काश्मीरची केंद्रशासित प्रदेश म्हणून पुनर्रचना करण्यात आली. केंद्रशासित प्रदेशाचा कारभार नायब राज्यपालांकडे सोपवण्यात आला. वर्षभरापूर्वी ११ डिसेंबर २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला सप्टेंबरपर्यंत विधानसभा निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते आणि केंद्राला कोणतीही कालमर्यादा न देता लवकरात लवकर राज्याचा दर्जा बहाल करण्यास सांगितले होते. जर अनेक सत्ताकेंद्रे असतील तर कोणतेही संघटन योग्यरीत्या काम करू शकत नाही. त्यामुळेच सांघिक खेळांमध्ये एकच कर्णधार असतो. त्याचप्रमाणे भारत सरकारमध्ये दोन पंतप्रधान अथवा सत्तेची दोन केंद्रे असू शकत नाहीत.

# नातेवाईकाच्या कंपनीत काम करायचं नव्हतं म्हणून तरुणानं स्वतःचीच चार बोटं छाटली

■ **सूरत : विशेष प्रतिनिधी**

नातेवाईकाच्या डायमंड कंपनीत मनाविरुद्ध जाऊन कम्प्युटर ऑपरेटरची नोकरी करावी लागत असल्यामुळे गुजरातच्या सूरत यथील एका तरुणानं स्वत:च्या डाव्या हाताची चार बोटं छाटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मयूर तारापरा (वय ३२) असे या युवकाचे नाव आहे. सुरुवातीला त्याने कुणीतरी बोटं छाटली असल्याचा बनाव केला. त्याने पोलिसांना सांगितले की, मित्राच्या घरी जात असताना त्याला चक्कर आली आणि तो अचानक रस्त्यावर पडला. जेव्हा त्याला शुद्ध आली तेव्हा त्याची चार बोटं कुणीतरी छाटली होती. मात्र पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत मयूर तारापराचं बिंग फुटलं आणि त्याने आपणच हे धक्कादायक कृत्य केल्याचं मान्य केलं.

**नातेवाईकाच्या कंपनीत काम करायचं नव्हतं**

सूरत गुन्हे विभागाने या प्रकरणाचा तपास केल्यानंतर त्याबद्दल निवेदन प्रसिद्ध केलं आहे. मयूर तारापराला नातेवाईकांच्या डायमंड कंपनीत काम करायचं नव्हतं. सूरतच्या हिरा बाजारात अनभ जेम्स नावाच्या कंपनीत तो अकाऊंट विभागात कम्प्युटर ऑपरेटर म्हणून काम करत होता. आपली बोटंच नसतील तर आपण या



कामासाठी लायकच राहणार नाहीत आणि आपोआपच ही नोकरी सोडावी लागेल. असा विचार करून मयूर तारापरानं हे अजब पाऊल उचललं.

मयूर तारापरानं पोलिसांना सुरुवातीला सांगितलं की, ही घटना ८ डिसेंबर रोजी घडली. अमरोलीमध्ये दुचाकीवरून तो आपल्या मित्राच्या घरी जात होता. त्याचवेळी वेंदाता चौकात त्याला चक्कर आल्यामुळे तो खाली पडला. दहा मिनिटांनी जेव्हा शुद्ध आली आली तेव्हा त्याच्या डाव्या हाताची चार बोटं कापलेली असल्याचं दिसलं. पोलिसांना जेव्हा मयूरनं ही कथा सांगितली, तेव्हा त्यांना काळ्या जादूचा संशय आला. मात्र नंतर हळूहळू चौकशीत सत्य समोर आलं.

पोलिसांच्या चौकशीत मयूरनं स्वतःच हे कृत्य केल्याचं नंतर कबूल केलं. सिंगनपूर येथून एका दुकानातून त्यानं धारधार चाकू विकत घेतला होता. त्यानंतर रविवारी (८ डिसेंबर) रात्री तो अमरोली रिंग रोड येथे गेला. रात्री १० वाजता त्याने धारधार चाकूनं स्वत:ची बोटं छाटली आणि रक्तस्राव रोखण्यासाठी पुढे कपडा बांधला. त्यानंतर चाकू आणि छाटलेली बोटं एका पिशवित भरून फेकून दिलं.

# राडारोड्याचे २० वर्षांचे कंत्राट, बांधकामातील टाकाऊ साहित्याच्या पुनर्वापराचा महानगरपालिकेचा निर्णय

■ **मुंबई : सम्यक कासारे**

मुंबई शहरातील नवी बांधकामे आणि बांधकामातील टाकाऊ साहित्य (राडारोडा) तसेच किरकोळ घरदुरुस्तीतून निर्माण होणाऱ्या साहित्याच्या विल्हेवाटीसाठी पालिकेने यंत्रणा उभारली आहे. त्यासाठी दहिसर आणि कल्याण शिळ फाटा येथे दोन प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. संकलित राडारोड्याचा चुरा करून त्याचा पुनर्वापर केला जाईल. प्रति दिन १,२०० टनांची क्षमता असलेला हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प नोव्हेंबरपासून सुरू झाला.

जुन्या इमारतींचे पाडकाम किंवा घरातील दुरुस्तीच्या कामांमुळे निर्माण होणारा राडारोडा हटवण्यासाठी पालिकेकडे गेली काही वर्षे कोणतीही ठोस यंत्रणा नव्हती. राडारोडा टाकण्यासाठी कोणतीही यंत्रणा नव्हती. त्यामुळे मुंबईत बऱ्याचदा रात्रीअपरात्री कुठेही राडारोडा टाकला



जात होता. पालिकेने आता राडारोडा संकलित करण्यासाठी आणि त्याच्या विल्हेवाटीसाठी कंत्राटदार नेमले आहेत. राडारोडा संकलन, वाहतूक आणि त्यावरील शास्त्रोक्त प्रक्रिया, त्यासाठी जागा मिळवून प्रकल्प उभारणी, मनुष्यबळ आणि संयंत्रांची जबाबदारी कंत्राटदारावर सोपविण्यात आली आहे. पालिकेवर प्रकल्प जागा, भांडवली गुंतवणूक, परिरक्षण आणि तत्सम भांडवली बाबींच्या खर्चाचा भार आलेला नाही. या कंत्राटदारांच्या प्रकल्पांत राडारोडा नेल्यावर त्या ठिकाणी त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया केली जाईल. त्यातून तयार होणारे वाळूसदृश घटक फरसबंदी (पेव्हर ब्लॉक, दुभाजक, पदपथांसाठी लागणारे दगड, बाके (बेंच) यांसारख्या संरचनाविरहित (नॉन स्ट्रक्चरल) बाबींच्या निर्मितीसाठी संबंधित उद्योगांना वापरात येऊ शकतील. ही जबाबदारी संबंधित कंत्राटदारांवर सोपवण्यात आली आहे.

# शेतीमालाच्या हमीभावाने खरेदीला मुदतवाढः सोयाबीन, मूग, उडदाची खरेदी कधीपर्यंत

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

सोयाबीन, मूग आणि उडदाच्या हमीभावाने होणाऱ्या खरेदीला मुदतवाढ देण्यात आली आहे. डिसेंबरअखेर विविध सरकारी संस्थांकडून ही खरेदी होणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात शेतीमालाची हमीभावाने होणारी खरेदी चर्चाचा मुद्दा बनला होता. हमीभाव वाढून देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. १२ ते १५ टक्के ओलावा असलेले सोयाबीन खरेदी करण्याचे आदेशही केंद्र सरकारने दिले होते. पण, प्रत्यक्षात यापैकी काहीच झाले नव्हते. यंदा हमीभावाने होणारी खरेदी उशिराने झाली. विविध कारणांमुळे शेतीमालाची खरेदी संथगतीने झाल्यामुळे आणि प्रत्यक्षात



उत्पादन जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांकडे शेतीमाल पडून होता. त्यामुळे १२ ते १५ टक्के ओलावा असलेले सोयाबीन खरेदी करावे, प्रत्यक्ष शेतीमालाचे उत्पादन गृहीत धरून खरेदी व्हावी आणि हमीभावाने होणाऱ्या खरेदीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी विविध शेतकरी संघटनांसह राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत राज्याच्या पणन आणि सहकार विभागाने गुरुवारी (१२ डिसेंबर) शासन आदेश काढून शेतीमालाच्या विक्रीसाठी १५ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येईल आणि हमीभावाने होणारी खरेदी ३१ डिसेंबरपर्यंत चालू ठेवावी, असे संबंधित खरेदी संस्थांना दिले आहेत. विधानसभा निवडणूक काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पाहिले पाउल टाकले आहे. आता शेतकऱ्यांना डिसेंबरअखेर सोयाबीन, मूग आणि उडदाची हमीभावाने विक्री करता येईल. सरकारच्या या निर्णयाचा मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना फायदा होईल, असे मत राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी व्यक्त केले.

# पवई पोलीसांची मोठी कारवाई; ३ कोटी ३४ लाख रूपये किंमतीचे अंमली पदार्थ केले जप्त

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

शहरात अंमली पदार्थ सेवन आणि विक्रीस प्रतिबंध करण्यासाठी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांकडून विशेष मोहिम राबवण्यात आली. याअनुषंगाने परिमंडळ १० मधील अंमली पदार्थ सेवन आणि विक्रीच्या गुन्ह्यांना आळा घालणे यासाठी पवई पोलीस स्थानकातील पथक कार्यकरीत असून त्यांनी एका कारवाई दरम्यान जवळपास १३ किलो २१७ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ आणि गावठी कट्टा यासह एकास अटक केली. ९ डिसेंबर रोजी पोउनि सरक हे त्यांच्या पथकासह पवई पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यासाठी रवाना झाले होते. यावेळी चांदशहावली दर्गा कंपाउंडच्या बाजूला असलेल्या कब्रस्तान आणि विहार सरोवर जवळ एका राखाडी रंगाच्या मारुती अल्टो मोटार कारमध्ये मोहम्मद सादिक हनिफ सय्यद नावाचा आरोपी आढळून आला. सदर व्यक्ती हा अंमली पदार्थ विक्री करणार असल्याचे समजल्यावर पोलिसांनी वाहनांची तपासणी केली असता त्यातून ६ किलो ३२ ग्रॅम चरस हा अंमली पदार्थ, १८.५ सेमी लोखंडी बॅरल आणि एक गावठी बनावटीचा कट्टा येथे आढळून आला. अंमली पदार्थ आणि गावठी कट्टा पोलिसांनी जप्त केल्यावर सदर आरोपीची अजून सखोल चौकशी करण्यात आली. सखोल चौकशीनंतर आरोपीकडून मिळालेल्या माहितीनुसार चांदशहावली दर्गा कंपाउंड हवालदिल एका खोलीतून ७ किलो १८५ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.



त्यावरून पवई पोलीस ठाणे गु.र.क्र ९८०/२०२४ कलम ८ (क) सह २० (ब), २ (क) एन.डी.पी.एस. अॅक्ट १९८५ सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातून सुमारे ३,३०,४२,५०० रुपयांचा १३ किलो २१७ ग्रॅम वजनाचा चरस हा अंमली पदार्थ, १०००० रुपयांचा एक गावठी कट्टा, सुमारे ४००००० रुपयांची मारुती अल्टो मोटार कार, ०१ चिलीम आणि रोख ३४१० रुपये असा एकूण ३,३४,५५,९१० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून आरोपी मोहम्मद सादिक हनिफ सय्यद, वय ४६ वर्ष यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीवर अंमली पदार्थ विक्रीचा ०२ आणि अंमली पदार्थ सेवनाचा ०१ गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई देवेन भारती, पोलीस सह आयुक्त, (का व सु) सत्यनारायण अप्पर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) परमजितसिंह दहिया, पोलीस उपायुक्त परिमंडळ १० चे गा. सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग प्रदिप मैराळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पवई जितेंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि प्रविण पवार (का व सु), सपोनि संतोष कांबळे (DO) पोउनि शोभराज सरक, पो हवा. उदय लांडगे, पो. हवा. सुभाष खंडागळे, पो शि राकेश अहिरे, पो शि केदार गायकवाड, पो शि निवृत्ती पवार यांनी केली आहे.

# पुण्यात पीएमटीचे बस थांबे बनले चोरट्यांचे अड्डे; ११ महिन्यात तब्बल १६७ घटना

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

पुणेकरांची 'जीवनवाहिनी' असलेली पीएमटी अन् त्याचे बस थांबे सध्या चोरट्यांचे अड्डे झाल्याचे वास्तव आहे. गेल्या काही महिन्यांपासून पुन्हा एकदा चैन श्नॅचर टोळ्यांनी उचलखाली असून, बसमधील आणि थांब्यावरील गर्दीत महिला व ज्येष्ठांना टार्गेट करून त्यांच्याकडील मोबाईल व दागिने चोरून नेत असल्याच्या धक्कादायक घटना घडत आहेत. गेल्या ११ महिन्यांमध्ये तब्बल ६६ घटना घडल्या आहेत. त्यातील केवळ १३ घटना उघड करण्यात पोलिसांना यश आले आहे. जंगजंग पछाडून देखील पोलिसांना या घटना रोखता येत नसल्याचे दिसत आहे. तर, चोरट्यांचाही थांगपत्ता लागत नसल्याचे पाहिला मिळत आहे. पुणे शहरात गर्दीत चोऱ्या करणाऱ्या तसेच पादचारी महिला आणि नागरिकांना लुटणाऱ्या चोरट्यांनी काही महिन्यांपासून धुमाकूळ घातला आहे. दररोज दोन ते तीन घटना सरासरी घडत आहेत. त्यातही स्वारगेट बस स्थानक व शहरातील गर्दी असणारे पीएमपीचे थांबे हे चोरट्यांचे अड्डे झाल्याचे दिसत आहे. पीएमपी बसमध्ये चढत असताना आणि प्रवासात गर्दीत हे चोरटे महिलांच्या गळ्यातील,



बॅगेतील तसेच हातातील सोन्याचे दागिने व मौल्यवान वस्तू चोरून पोबारा करत आहेत. पीएमटी बसला सकाळी आणि सायंकाळी मोठी गर्दी असते. कार्यालये, ऑफिस तसेच शाळा व महाविद्यालये सुटल्यानंतर अनेकजन पीएमटीने प्रवास करतात. तेव्हा मोठी गर्दी असते. या गर्दीत चोरटे 'मिक्स' होतात. गर्दीत धक्काबुक्की व ढकला-ढकलीचा प्रसंग होत असतो. तीच संधी साधत चोरटे हेरून दागिन्यांवर व मोबाईल डल्ला मारत असल्याचे दिसत आहे. सातत्याने त्याच परिसरात घटना होऊन देखील पोलिसांना या चोरट्यांचा माग निघत नसल्याने नेमकी पोलिसांची गस्त असते कोठे असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. विशेष करून या घटना स्वारगेट बस स्थानक तसेच विमानतळचा परिसर आणि हडपसर भागात मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निरीक्षण आहे. आकडेवारीवरून देखील या घटना या भागात मोठ्या प्रमाणात घडल्याचे दिसत आहे. पुणे शहरात पादचाऱ्यांना लक्ष करून दुचाकीस्वार चोरटे त्यांच्याकडील चैन श्नॅचिंग तसेच मोबाईल हिसकावणारे देखील घटना मोठ्या प्रमाणात घडत असून, ११ महिन्यात तब्बल १६७ घटना घडल्या असून, त्यातील ७१ घटना उघडकीस आल्या आहेत.

# कुख्यात गुंड राजकुमार गुप्ता उर्फ राजू बैल याच्यावर तुळींज पोलिसांची एमपीडीए अंतर्गत कारवाई

**वसई : विशेष प्रतिनिधी**

नालासोपारा येथील कुख्यात गुंड राजकुमार गुप्ता उर्फ राजू बैल याच्यावर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई करून तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले. २०२४ या वर्षातील स्थानबद्ध करण्याची तुळींज पोलीस ठाण्याची पहिली आणि सुरू केले होते. त्याला पोलिसांनी हद्दपारही केले होते. मात्र तरी देखील त्याची गुन्हेगारी कृत्ये सुरू होती. त्याच्याविरोधात पोलिसांनी झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्याअन्वये (एमपीडीए) स्थानबद्ध करण्याची तयारी सुरू केली. ही प्रक्रिय पूर्ण केल्यानंतर त्याला अटक करून त्याची रवानगी नाशिक




आयुक्तालयातील ही तिसरी कारवाई आहे. नालासोपारा पूर्वेच्या मोरेगाव येथे राहणारा राजकुमार लालचंद गुप्ता उर्फ लालू बैल (३६) याच्या विरोधात नालासोपारा आणि तुळींज पोलीस ठाण्यात अमली पदार्थाची तस्करी, मारमारी, शस्त्र बाळणे आदी विविध गुन्ह्यात १३ हून अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याची या परिसरात दहशत होती. फेब्रुवीर २०२१ मध्ये मोरेगाव नाका येथे पूर्ववैमनस्यातून ३ जणांनी तलवारीने हल्ला करून ५ राऊंड गोळीबार केला होता. या हल्ल्यात गुप्ता जखमी झाला होता. त्याच्या डोक्यात गोळी लागल्याने तो काही महिने रुग्णालयात कोमा मध्ये होता. रुग्णालयातून सुटल्यानंतर त्याने पुन्हा गुन्हेगारी कृत्य कारागृहात करण्यात आली आहे. परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले- श्रींगी यांच्या आदेशानुसार अनिल शिंदे, आकाश वाघ आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पार पाडली. या आरोपीवर अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. त्यामुळे त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली अशी माहिती तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद तावडे यांनी दिली. शहरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर अशी कारवाई आवश्यक असते. ही प्रक्रिया किचकट असते आणि ती संयतपणे हाताळावी लागते. त्यानुसार आमच्या पोलिसांनी ही कारवाई केली आहे, अशी माहिती पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिली.

# इंस्टाग्रामवरील जाहिरातीवर क्लिक करणं पडलं महागात, ७१ लाखांची फसवणूक

**पिंपरी : विशेष प्रतिनिधी**

सोशल मीडिया हे जीवनातील अविभाज्य घटक झाला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम, एक्स या ॲपवर आपण दिवसभर ॲक्टिव्ह असतो. पण हेच सोशल मीडियाचे प्लॅट-फॉर्म आपल्याला महागात ही पडू शकतात. पिंपरी- चिंचवडमधील संगणक अभियंत्याची ७१ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. इन्स्टाग्रामवर आलेल्या जाहिरातीवर क्लिक केल्यानंतर त्यांना शेअर मार्केटच्या ग्रुपमध्ये ॲड करून चांगले रिटर्न देण्याचं आमिष दाखवून तब्बल ७१ लाखांची फसवणूक केली. घटनेप्रकरणी सायबर पोलिसांनी गोवा राज्यातून रशियन आरोपीला अटक केली आहे. आरोपी टोनीच्या माध्यमातून सर्व सूत्र पुण्यात राहणारा आरोपी श्रेयस संजय माने बघायचा त्याला देखील पोलिसांनी आधीच बेड्या ठोकल्या आहेत. सविस्तर माहिती अशी, तक्रादार हे इन्स्टाग्रामवर रिल्स पाहात होते. रिल्स पाहात असताना त्यांना जाहिरात दिसली आणि कुठलाही विचार न करता त्यावर त्यांनी क्लिक केलं. काही क्षणातच वेगवेगळ्या नंबर वरून शेअर मार्केटच्या व्हाट्स ग्रुपला त्यांना ॲड करण्यात




आलं. शेअर मार्केटमध्ये चांगले रिटर्न मिळवून देण्याच आमिष दाखवलं. फेक वेबसाइटवरून शेअर मार्केटचे स्टॉक आणि आयपीओ ट्रेडिंग करण्यास सांगून ७१ लाखांची फसवणूक करण्यात आली. घटनेप्रकरणी संगणक अभियंता असलेले तक्रादार यांनी पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसात धाव घेतली. तक्रार नोंदवण्यात आली. सायबरचे पोलीस निरीक्षक स्वामी यांच्या टीमने तपास करण्यास सुरुवात केली. ज्या बँक खात्यात पैसे गेले ते बँक खाते गोवा राज्यात वापरलं असल्याचं तपासात पुढे आलं. सायबर पोलिसांची टीम गोवा येथे गेली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने रशियन आरोपी टोनीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. आरोपी श्रेयसला आधीच पोलिसांनी अटक केली आहे. श्रेयस हा मित्रांकडून गेमिंगच्या नावाने बँक खाते आणि मोबाईल लिंक घेऊन तो विमानाने गोव्याला जायचा. तिथं टोनीसोबत संपर्क साधून त्याच्याकडून सायबर गुन्हे करवून घेत असल्याचे समोर आलं आहे. गुन्ह्यातील रक्कम दुबई आणि इतर ठिकाणी वळवण्यात आली आहे. रशियन आरोपी टोनीचा शोध गुजरात पोलीस देखील घेत होते. प्रकरणी मार्क, श्रेयस आणि टोनी तिघेजण सायबर गुन्हे करत असल्याचं उघड झालं आहे. पैकी, दोघांना अटक करण्यात आली आहे.

# डोंबिवलीत सारस्वत बँकेत बनावट नोटा भरल्याप्रकरणी गुन्हा

**डोंबिवली : विशेष प्रतिनिधी**

डोंबिवली येथील पूर्व भागातील सारस्वत बँकेत पाचशे रूपयांच्या ४५ बनावट नोटा भरणाऱ्या ग्राहकाविरुध्द




रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ग्राहक हे कल्याण तालुक्यातील फळेगाव येथील रहिवासी आहेत. सारस्वत बँकेच्या व्यवस्थापक विनिता बांदकर यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे हा गुन्हा दाखल झाला आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गेल्या मंगळवारी फळेगाव येथील एक बँक ग्राहक सारस्वत बँकेत एटीएमच्या माध्यमातून पैसे भरण्यासाठी आले होते. त्यांच्याजवळ ५०० रूपयांच्या ९० नोटा असे एकूण ४५ हजार रुपये होते. त्याने ही रक्कम एटीएममध्ये भरणा केली. एटीएम यंत्राने या नोटांची अंतर्गत छाननी करताना खऱ्या ४५ नोटा बाहेर ढकलल्या. या नोटा ग्राहकाने ताब्यात घेतल्या. उर्वरित ४५ नोटा बनावट असल्याने त्या एटीएम यंत्रातून बाहेर आल्या नाहीत. एटीएममध्ये नोटा अडकल्याने ही माहिती ग्राहकाने बँके बाहेरील सुरक्षा रक्षकाला दिली. सुरक्षा रक्षकाने ही माहिती कार्यालयातील अधिकाऱ्यांना दिली. बँक अधिकाऱ्यांनी एटीएम यंत्रात अडकलेल्या ४५ नोटा बाहेर काढल्या. त्यांची तपासणी केली असता त्या नोटांचा कागद व्यवहारातील नोटेच्या कागदापेक्षा जाड होता. या नोटेवरील सुरक्षेच्या खुणांमध्ये तफावत बँक अधिकाऱ्यांना आढळली. या बनावट नोटांबद्दल अधिकाऱ्यांनी संबंधित ग्राहकाला या नोटा कोठुन आणल्या याची विचारपूस केली. त्यांनी या नोटा आपणास व्यवहारातून मिळाल्या आहेत असे सांगितले. बनावट नोटा २२ हजार ५०० रूपयांच्या होत्या.

# गुजरातमधील सोनसाखळी चोर वसईत सक्रीय, गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक

**वसई : विशेष प्रतिनिधी**

वसई विरार शहरात गुजरात राज्यातील सोनसाखळी चोर सक्रीय झाले आहेत. मागील महिन्यात एकाच दिवसात दोन सोनसाखळी चोरीच्या घटनांचा छडा वालीव आणि माणिकपूर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने लावला असून गुजरातमधील कुख्यात चोर कन्नुभाई उर्फ कन्हैय्या सोलंकी याला त्याच्या साथीदारासह अटक केली आहे. शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी वसईत एकाच दिवसात दोन सोनसाखळी चोरीच्या घटना घडल्या होत्या. वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथे प्रज्ञा वाडिया (५३) या महिलेच्या गळ्यातून दुचकावीरून जाणाऱ्या दोन तरूणांनी त्यांच्या गळ्यातील १ तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. काही अंतरावरच असलेल्या गोखिवरे तलाव रोड येथे दुसरी घटना घडली.उर्मिला वापीवाला (७०) या सुमारास गॅलेक्सी अपार्टमेंट समोरून जात असताना मोटारसायकल वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याजवळ जाऊन मोटारसायकल थांबवली आणि पत्ता विचारण्याच्या बहाण्याने त्यांना त्या पत्ता सांगत असताना दोघांना त्यांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील ७ ग्रॅम वजनाची सोन्याच्या धातूची साखळी खेचून पळ काढला.

# खड्ड्यात पडून मृत्यूप्रकरण; बांधकाम विकासकाविषयी प्रशासन अनभिज्ञ

**नवी मुंबई : विशेष प्रतिनिधी**

कोपरखैरणे सेक्टर पाच येथे एका इमारतीसाठी खणलेल्या खड्ड्यात पडून ९ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मनपा प्रशासन खडबडून जागे झाले आहे. पोलीस आणि मनपा प्रशासनाला या इमारतीच्या विकासकाचे नावही माहिती नसल्याचे उघड झाले आहे. हे बांधकाम अनेक वर्षापासून रखडलेले आहे. दरम्यान,



बुधवारी रात्री उशिरा या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंकित ठनूगा , वय वर्ष ९ असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. सेक्टर ५ मध्ये हे इमारत बांधकाम सुरू होते. या ठिकाणी खणलेल्या खड्ड्यातील पाण्यात पडून त्याचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी घटना घडली त्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टीत तो राहत होता. घरात एकुलता एक असल्याने या घटनेने केवळ कुटुंबीयच नव्हे तर परिसरातील नागरिक सुन्न झाले आहेत. मुलाचा मृत्यू ही घटना बुधवारी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास उघडकीस आली. इमारत बांधकाम वेळी चारही दिशेला पत्रे बांधणे सुरक्षा रक्षक ठेवणे विहित वेळेत काम पूर्ण करणे या तिन्ही नियमांना हडताळ फासले असल्याची स्थिती आहे. केवळ दर्शनी भागात पत्रे लावण्यात आले आहेत तर मागच्या बाजूला केवळ लाकडी पट्टया रोवल्या आहेत. तेथूनच कदाचित हा मुलगा आला असावा अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे बांधकाम क्षेत्र आणि मनपा शाळा क्रमांक ३५ यांच्यात केवळ लोखंडी संरक्षक कठडा आहे. त्यालाच चिकटून खोदलेल्या खड्ड्यात अंकित याचा बुडून मृत्यू झाला आहे.

# ठाणे जिल्ह्यातून बनावट औषधांची रुग्णांना विक्री, आंतरराज्यीय टोळीचा सहभाग

**ठाणे : विशेष प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भिवंडी शहरातून बनावट औषधांची रुग्णांना विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. औषध प्रशासनाने एक कोटी ८५ लाख रुपयांचा साठा जप्त केला असून ही औषधे अँटिबायोटिक (प्रतिजैविक) असल्याचे प्रशासनाने सांगितले.




या प्रकरणी औषध प्रशासन विभागाकडून नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. आंतरराज्यीय टोळी यामध्ये सहभागी असून त्यादिशेने औषध प्रशासनाचा तपास सुरू आहे. गेल्या काही महिन्यांपासून बनावट औषधांप्रकरणी आतापर्यंत आठ गुन्हे दाखल झाले आहेत. या बनावट औषधांचा साठा सरकारी रुग्णालयांमध्येही विक्री झाल्याचे उघड झाले होते. भिवंडीमधील एका गोदामामध्येही बनावट औषधांचा साठा असल्याची माहिती औषध प्रशासनाला प्राप्त झाली होती. त्यानुसार औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या औषधांचा साठा विक्रीस प्रतिबंधित केला होता. या औषधांचे नमुने तपासल्यानंतर ते बनावट आढळून आले. त्यानंतर पथकाने एक कोटी ८५ लाख रुपयांच्या बनावट औषधांचा साठा जप्त केला. यप्रकरणात औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट औषधांची विक्री रुग्णांनाही झाली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय टोळी कार्यरत असून त्यादिशेने औषध प्रशासनाचा तपास सुरू आहे.

# तळोजा कारागृहाचे वरिष्ठ तुरुंग अधिकारी व पोलीस शिपायाला अटक; १० हजारांची लाच घेतल्याचा आरोप, एसीबीची कारवाई

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

कैद्याच्या भावाकडून १० हजार रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने(एसीबी) नवी मुंबईतील तळोजा मध्यवर्ती कारागृहातील वरिष्ठ तुरुंग अधिकारी निवृत्ती कन्नेवाड व पोलीस शिपाई राहुल गरड यांना अटक केली. यापूर्वीही तक्रारदार यांच्याकडून आरोपी गुगल पेद्वारे रक्कम घेतल्याचा आरोपी तक्रारीत करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी सद्या एसीबी कोठडीत आहेत. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचा भाऊ हा २०१८ पासून नवी मुंबईतील तळोजा मध्यवती कारागृहात न्यायालयीन कोठडीत बंदी आहे. तक्रारदार यांच्या भावाने ११ डिसेंबर रोजी तक्रारदार यांना दूरध्वनी करून तुरूंग अधिकारी कन्नेवाड हे पैसे मागत असून पैसे न दिल्यामुळे त्याला खूप त्रास देत आहेत, असे



सांगितले. तसेच १३ डिसेंबरला सत्र न्यायालयात घेऊन जाणार आहेत, त्यापुर्वी तुरूंग अधिकारी कन्नेवाड व बाबाला (कारागृह अंमलदार राहूल गरड) यांना एक हजार रुपये दयायचे आहेत, असे सांगितले. त्यानंतर एका मोबाईल क्रमांकावरून तक्रारदार यांना १२ डिसेंबरला पैशांबाबत व्हॉट्सअप संदेश व दूरध्वनी आला. त्यानंतर त्या मोबाईल क्रमांकावर तक्रारदार यांनी एक हजार रुपये गुगल पेद्वारे पाठवले. त्यानंतर त्याचा स्क्रीटशॉट काढून पाठवला. त्यानंतर १३ डिसेंबरला तक्रारदाराला त्या मोबाईल क्रमांकावरून ओके असा संदेश आला व पुन्हा पैशांची मागणी करण्यात आली. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे १३ डिसेंबरला त्यांनी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार दिली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबईने यांनी याबाबत पडताळणी केली. त्यावेळी आरोपी पोलीस शिपाई राहुल गरड यांनी १० हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर शनिवारी लाचलुचत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळ्यात राहुल गरड याने १० हजार रुपयांची लाच स्वीकारली. तसेच त्याबाबत वरिष्ठ तुरुंग अधिकारी निवृत्ती कन्नेवाडच्यांच्यास संपर्क साधला. त्यानंतर कन्नेवाड यांनी गरड यांच्या यांच्याकडून १० हजार रुपये स्वीकारताना पकडण्यात आले. त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. एसीबीने दोघांनाही अटक केली असून त्यांना याप्रकरणी १७ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# राज्यातील साडेदहा हजारांहून अधिक गृहप्रकल्पांना 'महारेरा'ने 'कारणे दाखवा' नोटीसा बजावली

■ मुंबई : राकेश गायकवाड

राज्यातील १० हजार ७७३ व्यापगत (लॅप्स) गृहप्रकल्प मार्गी लावण्यासाठी विकासकांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने अखेर आता 'महारेरा'ने अशा प्रकल्पांविरोधात कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. या १० हजार ७७३ प्रकल्पांना 'महारेरा'ने 'कारणे दाखवा' नोटीसा बजावली आहे. या नोटीसला संबंधित विकासकांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही तर 'महारेरा'कडून प्रकल्पांची नोंदणी रद्द करणे वा स्थगिती करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पाचे बँक खातेही गोठवण्याची शक्यता आहे. रेरा कायद्यानुसार राज्यातील गृहप्रकल्पांना 'महारेरा' नोंदणी बंधनकारक आहे. नोंदणी करताना विकासकांना प्रकल्प पूर्णत्वाची निश्चित तारीख नमुद करून त्या कालावधीत प्रकल्प पूर्ण करणे विकासकांना बंधनकारक असते. या कालावधीत प्रकल्प पूर्ण न झाल्यास आवश्यक ती कार्यवाही करून विकासकांना काही दिवसांची मुदतवाढ घेता येते. मोठ्या संख्येने विकासक प्रकल्प पूर्ण करत नसून मुदतवाढीची कार्यवाही करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांना व्यापगत (लॅप्स) प्रकल्प घोषित करून त्यांचे काम थांबवून घरविक्री बंद केली जाते. आतापर्यंत 'महारेरा'ने अनेक प्रकल्पांना व्यापगत घोषित केले आहे. व्यापगत घोषित केल्यानंतरही मोठ्या संख्येने विकासक पुढील कोणतीही कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याचा फटका ग्राहकांना बसत आहे. ही बाब लक्षात घेत अखेर आता 'महारेरा'ने १० हजार ७७३ प्रकल्पांना 'कारणे दाखवा' नोटीसा बजावल्या आहेत. २०१७




पासून नोंदणी झालेल्या प्रकल्पांचा यात समावेश आहे. महारेराच्या नोटीशीनुसार प्रकल्प पूर्णत्वाचे काय? असा प्रश्न विचारण्यात आला आहे. प्रकल्प पूर्णत्वाविषयी आपण कोणताही माहिती महारेराकडे नोंदवलेली नाही. याची गंभीर दखल घेत कारणे दाखवा नोटीसा बजावल्याचेही नोटीशीत म्हटले आहे. तर नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रकल्प पूर्ण झाला का, त्याचे निवासी प्रमाणपत्र, प्रकल्प पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, प्रपत्र ४ सादर करणे किंवा प्रकल्पाच्या मुदतवाढीसाठी अर्ज करणे; अशी कारवाई पूरक कागदपत्रांसह करावी. अन्यथा ३० दिवसांनंतर एकही दिवसाची मुदतवाढ न देता प्रकल्पाची थेट नोंदणी रद्द करणे किंवा स्थगित केली जाईल. प्रकल्पाविरोधात दंडात्मक कारवाई करून सदनिका विक्री-खरेदी आणि अन्य व्यवहार रद्द केले जातील. तसेच प्रकल्पाचे बँक खाते गोठविण्याची प्रक्रियाही महारेराकडून केली जाईल, असा इशारा या नोटीशीद्वारे विकासकांना देण्यात आला आहे. दरम्यान, १० हजार ७७३ प्रकल्पांमध्ये सर्वाधिक प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील आहेत. एमएमआरमधील अशा प्रकल्पांची संख्या ५,२३१ इतकी आहे. तसेच पुण्यातील ३४०६, नाशिकमधील ८१५, नागपूरमधील ५४८, संभाजीनगरमधील ५११, अमरावतीतील २०१, दादरा हवेतील ४३ आणि दमण दिवच्या १८ प्रकल्पांचा त्यात समावेश आहे.

## उद्याने बकाल; सुरक्षा धोक्यात; महानगरपालिकेच्या अनास्थेमुळे नवी मुंबई शहरातील उद्यानांची दुरवस्था

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई शहरात जवळजवळ २०० सार्वजनिक उद्याने आहेत. सर्वात जास्त उद्याने ही नेरुळ व बेलापूर विभागात आहे शहरातील उद्यानात पालिकेच्या दुर्लक्षामुळे बालगोपाळांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. उद्यानात लहान मुलांसाठी असलेल्या



घसरगुंडीची दुरवस्था पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी झोपाळे, नामफलक गायब आहेत. दरम्यान, वाशीतील उद्यानात एका मुलाचा पालिकेच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना घडल्यानंतरही पालिका प्रशासनाला जाग आली नसल्याचे चित्र आहे. नेरुळ सेक्टर, १९,२१,२३, २५, परिसरात अनेक उद्याने असून सर्वात मोठे उद्यान असलेल्या शंकराचार्य उद्यानाकडे पालिकेचे व ठेकेदाराचे दुर्लक्ष झाल्याचे पाहायला मिळते. या उद्यानात मुलांना खेळण्यासाठी लावलेली घसरगुंडी तसेच लहान मुंलाना बसण्यासाठीच्या बैठक व्यवस्थेचा पत्रा तुटला आहे. त्यामुळे लहान मुलांना गंभीर दुखापतीची शक्यता आहे. उद्यानात असलेले झोपाळे तुटलेले तर काही झोपाळे गायब आहेत. उद्यानाचा नामफलकही काढून टाकण्यात आला आहे.

ही उद्याने म्हणजे मुलांसाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे असून चालणे, व्यायाम करणे यासाठी शहरातील सर्वच उद्यानात नेहमीच गर्दी असते. वाशी सेक्टर ४ कर्मवीर भाऊराव पाटील उद्यान, सेक्टर ७ येथील आई बाबा उद्यान सेक्टर ४ येथील निवारा शेड , वाशी सेक्टर १ ते ६ या विभागातील ट्री बेल्ट यासह वाशी मिनी सी शोअर परिसरातील उद्यानांमध्येही सुट्टीच्या व इतर दिवशी गर्दी पाहायला मिळते.

नवी मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात उद्यान विभागासाठी जवळजवळ ८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. तरीदेखील शहरातील उद्यानांमधील खेळाची साधने कमी जास्त प्रमाणात तुटलेली वा खराब झालेली आहेत. त्यामुळे देखभाल दुरुस्तीच्या बाबत सातत्याने तक्रारी समोर येत असतात. नेरूळ येथील शंकराचार्य उद्यानात खेळणी तुटली असतील ती बदलण्यात येतील. शहरातील उद्यानामधील खेळण्यांनबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येईल.

## वाहतूक पोलिसांनी लोक अदालतीमुळे केला १७ कोटींचा दंड वसूल

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

ई-चलनच्या थकीत दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी लोक अदालतमध्ये धाव घेतल्यानंतर २ लाख ३० हजार ई-चलनवरील थकीत १६ कोटी २६ लाख रुपयांचा दंड चालकांनी भरला. लोक अदालतच्या सुनावणीपूर्वी शहरातील अनेक थकीत वाहनचालकांना नोटीस बजावून थकीत दंड भरण्यास सांगण्यात आले होते. २०१९ मध्ये वाहतूक पोलिसांनीही ई-चलन यंत्रणा कार्यान्वित केली होती. त्यातील थकीत रक्कम वाढल्यामुळे वाहतूक पोलिसांनी संबंधित चालकांना नोटीस पाठवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला



वाहतूक पोलिसांचे कर्मचारी या चालकांच्या घरीही जाऊन चालकांना दंडाची रक्कम भरण्यास सांगितले होते. त्यानंतरही अनेक वाहनचालकांनी दंडाची रक्कम न भरल्यामुळे वाहतूक पोलिसांनी एक पाऊल पुढे जाऊन याप्रकरणी लोक अदालतमध्ये धाव घेतली होती. दरम्यान, १४ डिसेंबरला लोक अदालत झाली होती. प्रलंबित दंडाची रक्कम भरण्यासाठी चालकांना मोबाईलवर संदेश पाठवण्यात आले होते. यावेळी लोकअदालतमध्ये दोन लाख ३० हजार १७५ प्रलंबित ई-चलनांची एकूण १७ कोटी २७ लाख ७० हजार २५० एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

## पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुरू केला 'पोलीस दवाखाना'

■ पिंपरी-चिंचवड : शकिल शेख

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी पोलीस दवाखाना सुरू केला आहे. दवाखान्याचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. पोलीस हे २४ तास



ऑनड्युटी राहतात. त्यांच्या प्रकृतीवर अनेकदा परिणाम होतो. आजार देखील उद्भवतात. त्यामुळेच अशा सुसज्ज असा पोलीस दवाखाना सुरू करण्यात आला आहे. पोलीस म्हणालो की,ताण तणाव हा नक्कीच असतो. भारत हा असा देश आहे ज्या ठिकाणी सण-उत्सव सर्वात जास्त साजरे केले जातात आणि याच सण- उत्सवात सुरक्षेची जबाबदारी आणि काही अनिश्चित प्रकार घडू नये म्हणून पोलीस हे तत्पर राहतात. यामुळेच ते अनेकदा त्यांच्या कुटुंबासमवेत सण आणि उत्सव देखील साजरे करत नाहीत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून ते २४ तास कार्यरत असतात. कामाचा ताण आणि शारीरिक, मानसिक थकवा आल्याने स्वत:कडे देखील लक्ष देण्याची वेळ पोलिसांकडे बहुतांशदा नसते. अनेक आरोग्याचे प्रश्न उद्भवतात. हेच हेरून पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाने वाकड परिसरातील कावेरी नगर येथे पोलीस दवाखाना कार्यान्वित केला आहे. या हॉस्पिटलसाठी डॉ. राधाकृष्ण पवार यांचे मोलाचे योगदान लाभलं आहे. वैद्यकीय अधिकारी श्रीमती अनुपमा कांबळे, डॉ. संजय भारती यांच्यासह आठ जणांचा स्टाफ या ठिकाणी नियुक्त करण्यात आला आहे. पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात एकूण ४,९२७ महिला आणि पुरुष अधिकारी आणि कर्मचारी कार्यान्वित आहेत. त्यांचे आरोग्य सांभाळण्यासाठी पोलीस दवाखाना सुरू करण्यात आल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले आहे.

## भाजपविरोधी बंडखोरांना शिंदे गटाचे दार खुले? पालिकेत वर्चस्व मिळवण्यासाठी व्यूहरचना

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

विधानसभा निवडणुकीत बेलापूर आणि ऐरोली या दोन्ही मतदारसंघांतून भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंडखोरी करणारे विजय नाहटा आणि विजय चौगुले यांना समर्थन देणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पुन्हा पक्षात घेण्यासाठी शिवसेना शिंदे गट सक्रिय झाला आहे. पक्षाच्या मंगळवारी पार पडलेल्या मेळाव्यात तसा सूर व्यक्त करण्यात आला. त्याचवेळी नाहटा आणि चौगुले यांच्या परतीचा निर्णय एकनाथ शिंदेच घेतील, असे नवीन जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांनी स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुकीत शिंदे गटाला चांगले यश मिळाल्याने पक्षाच्या नेते, पदाधिकाऱ्यांचा उत्साह वाढला आहे. ठाणे जिल्ह्यातही महायुतीला १८ पैकी १६ जागा मिळाल्या. त्यामुळे जिल्ह्यातील महापालिकांच्या आगामी निवडणुकांत महायुतीच वर्चस्व मिळवेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांना वाटत आहे. नवी मुंबईत मात्र, शिंदे गटाला प्रमुख आव्हान भाजपचेच असेल, असे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा मेळावा मंगळवारी पार पडला. त्यात महापालिका निवडणुकीची तयारी हा प्रमुख मुद्दा होताच; पण त्याबरोबरच पक्षातील बंडखोरांची 'घरवापसी' घडवून संघटनेला आणखी बळ



देण्यावरही चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीत बेलापूर येथून विजय नाहटा तर ऐरोलीतून विजय चौगुले यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात बंड पुकारले. त्यापैकी नाहटा यांनी महायुतीतून उमेदवारी न मिळण्याची शक्यता पाहून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे दार ठोठावले. त्या पक्षाकडून उमेदवारी मिळेल, अशी आशा असतानाच संदीप नाईक यांनी मागल्या दाराने पवार गटात प्रवेश करून उमेदवारीही पटकावली. मात्र, त्यानंतरही नाहटा यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. त्यांना शिंदे गटातील काही पदाधिकाऱ्यांनी खुलेपणाने तर काहींनी छुपा पाठिंबा दिला. आता त्यातील अनेक जण पक्षात परतण्यासाठी धडपडत असल्याचे समजते. वाशीतील मेळाव्यात बोलताना पक्षात असलेल्या काही पदाधिकाऱ्यांनी हा मुद्दा मांडला. तर जिल्हाप्रमुख पाटकर यांनी 'जे अन्य पक्षात गेले नसतील त्यांचे स्वागत आहे', असे सांगून या पदाधिकाऱ्यांसाठी दारे खुली असल्याचे संकेत दिले.

मेळाव्यात बोलताना पाटकर यांनी वाशी प्रभागातून मंदा म्हात्रे यांना आघाडी मिळवून दिली. त्यामुळे म्हात्रे यांचा विजय झाला, असा दावा केला. तसेच महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांनी आपली वैयक्तिक माहिती पदाधिकाऱ्यांकडे जमा करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

## पुणे रेल्वे स्थानक परिसरात 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा सुरू

■ पुणे : अभिजीत येरल्लू

पुणे रेल्वे स्थानक परिसरातील 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. ही सुविधा सुरू झाल्यापासून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत १८ हजारांहून अधिक प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घेतला असून ३१ लाखांपेक्षा जास्त व्यवहार या सुविधेमार्फत झाले आहेत. प्रवासी सेवा संघाचा करार संपुष्टात आल्यानंतर तीन महिन्यांपासून ही सुविधा बंद करण्यात आली होती. रेल्वे स्थानकातील परिसरात मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला प्रीपेड ऑटो रिक्षा केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आतापर्यंत एक हजार २४९ रिक्षाचालकांनी नोंदणी केली आहे. प्रवाशांना नियोजित ठिकाणी जाण्यासाठी अगोदरच ऑनलाइन शुल्क घेतले जात आहे. त्यामुळे तक्रारी, वादविवाद या घटनांना पूर्णत: आळा घालता येणे शक्य झाले आहे. तसेच बेकायदा रिक्षाचालकांकडून प्रवाशांची होणारी लूटमार रोखण्यात फायदा होत असल्याचा दावा उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) करण्यात आला आहे. पुणे रेल्वे स्थानकात रिक्षाचालकांकडून बेकायदा पद्धतीने प्रवाशांकडून प्रवासी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आरटीओ, पुणे शहर वाहतूक पोलीस, रेल्वे प्रशासन, पुणे महानगरपालिका




यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीने रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र नियमावली तयार केली आहे. त्यामुळे प्रवासी वाहतूक संघटनेच्या सदस्यांवर या समितीने दिलेले निकष बंधनकारक आहेत. तसेच खटुआ समितीच्या निर्देशानुसार पाच किलोमीटर अंतर असल्यास नियमित दरापेक्षा १० टक्के जास्त शुल्क आणि त्यापेक्षा जास्त अंतर असल्यास १५ टक्के जास्त शुल्क आकारले जात आहे, अशी माहिती पुणे आरटीओचे अधिकारी स्पप्नील भोसले यांनी दिली.

'जुलै २०२४ मध्ये वाहतूक संघटनेसोबत असलेला करार संपुष्टात आल्याने, तसेच नोंदणीकृत सदस्यांपैकी काही सदस्यांच्या कागदपत्रांमध्ये अपूर्तता आढळून आल्याने ही सेवा बंद करण्यात आली होती. मात्र, संघटनेने ही प्रक्रिया पूर्ण केल्याने रेल्वे स्थानकातील 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे.- केशव क्षीरसागर, अध्यक्ष, भारतीय गिग कामगार मंच

*काय आहेत फायदे?*

*- रेल्वे स्थानकात बेकायदा रिक्षाचालकांना रोखण्यास मदत होत आहे.*

*- भांडणे, तक्रारी टाळण्यास मदत होत आहे.*

*- शुल्क निश्चित केल्याने प्रवाशांची लूटमार थांबविणे शक्य होत आहे.*

*- ज्येष्ठ आणि महिला प्रवाशांना सुरक्षित आणि सुलभ प्रवास करता येणे शक्य झाले आहे.*

## नालासोपाऱ्यातील पुराचा प्रश्न अखेर सुटला, निळेगावात कामाला रेल्वे मंत्रालयाची परवानगी

■ वसई : सुचिता देशमुख

नालासोपारा पश्चिमेच्या निळेमोरे गावातील दरवर्षी निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीवर अखेर तोडगा निघाला आहे. येथील रेल्वेच्या ५ एकर जागेवर धारण तलाव तयार करून त्याचे सुशोभिकरण करण्याच्या निर्णयाला केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी मान्यता दिली आहे. नालासोपारा पश्चिमेला रेल्वे स्थानकाला लागून निळेगावात वसलेले आहे. या गावाच्या वेशीवर रेल्वेच्या दगडखाणीची सुमारे ५ एकर जागा आहे. मात्र आता ही दगडखाण वापरात नाही. परंतु हीच जागा गावाच्या पूरपरिस्थितीला कारणीभूत ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होत आहे. दरवर्षी पुराचे पाणी ३ ते ४ फूट घरांमध्ये शिरून नागरिकांच्या मालमत्तेचे



आर्थिक नुकसान होत असते. पूराचे पाणि निळेगावापासून श्रीप्रस्थ परिसरातपर्यंत साचून राहते. हे साचलेले पाणी चार-पाच दिवस उतरत नाही. त्यामुळे रोगराई पसरत असते. या भागात पूरस्थिती निर्माण झाल्याने रेल्वे रुळांवर पाणी साचून रेल्वे सेवा देखील विस्कळीत होत असते. हा परिसर रेल्वेच्या अखत्यारित येतो. तेथून पावसाचे पाणी गावात शिरत असते. त्यामुळे या दगडखाणी परिसरात धारण तलाव तयार करावा अशी येथील ग्रामस्थांची मागणी होती. वसई विरार महापालिकेने रेल्वे मंत्रालयाबरोबर पाठपुरावा करून दोन वर्षांपूर्वी तात्पुरता तोडगा म्हणून साडेपाच कोटी रुपये खर्चून तलाव बांधला होता. त्यामुळे तात्पुरता दिलासा मिळाला होता. पूर्ण समस्या सुटली नव्हती. खासदार डॉ हेमंत सवरा यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन ही समस्या मांडली. येथील स्थानिकांचा हा गंभीर प्रश्न होता.

## फोर्टिस हॉस्पिटलची First call Fortis मोहिम; २४/७ आपत्कालीन हेल्पलाइन सुरु

■ मुंबई : नितीन देवळेकर

आत्पतकालीन परिस्थितीमध्ये रुग्णासाठी एक एक सेकंद मोलाचा असतो. अशा प्रसंगांमध्ये मुंबईकरांना आपत्कालीन वैद्यकीय सेवा मिळवणे अधिक सोपे जावे यासाठी मुंबईतील फोर्टीस हॉस्पिटल्सनी एक एकीकृत २४/७ आपत्कालीन हेल्पलाइन सुरू केली आहे. ०२२-४१११ ४१११ या क्रमांकावर कॉल करून नागरिकांना मुंबईतील त्यांना जवळ असलेल्या फोर्टीस हॉस्पिटलशी संपर्क साधू शकतात, ज्यामुळे त्यांना फोर्टिसच्या लेव्हल १ ट्रॉमा सेंटर्सची सेवा वेगाने उपलब्ध होणार आहे. रुग्णवाहिन्यांच्या भक्कम जाळयाच्या आधारे हा उपक्रम केवळ एका कॉलद्वारे तात्काळ मदत मिळवून देतो त्यामुळेसंपूर्ण बृहन्मुंबईला विश्वासार्ह आणि प्राणरक्षक वैद्यकीय सेवा पुरविली जाते. The #FirstCallFortis या मोहिमेची जाहिरात सिनेमा थिएटर्स, शॉपिंग मॉल्स, बस थांबे, होर्डिंग्ज आणि डिजिटल माध्यमे अशा बहुविध मंचांवरून संपूर्ण मुंबईभर प्रसारित केली जात आहे. नागरिकांनी फक्त या हेल्पलाइनला (०२२-४१११ ४१११) फोन करायचा आहे आणि ५-७ किलोमीटर्सच्या अंतरातील नेटवर्क हॉस्पिटलकडून त्वरीत प्रतिसाद मिळण्याची तजवीज फोर्टिसकडून केली जाईल व जेव्हा मदतीची सर्वाधिक गरज असते त्या आणीबाणीच्या क्षणांमध्ये तज्ज्ञांची मदत पोहोचवली जाईल. फोर्टिस हॉस्पिटल्सचा दृष्टिकोन वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या पलिकडे जात मुंबईकरांमध्ये भरवशाची भावना निर्माण करणे, वैद्यकीय आणीबाणीच्या मदतीसाठी नेमके कुणाकडे जावे याची माहिती त्यांना असावी याची खबरदारी घेणारा आहे. सर्व वयाच्या लोकांशी जोडले जाण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून फोर्टिसने भारतात प्रथमच आरोग्यसेवा क्षेत्रामध्ये सीजीआय-आधारित डिजिटल जाहिराती प्रसारित करून आपत्कालीन देखभालीविषयीच्या जनजागृतीला एक ताजा आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन मिळवून दिला आहे.




या डिजिटल जाहिरातींची रचना लक्ष वेधून घेण्याच्या व महत्त्वपूर्ण चर्चा सुरू करण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे, ज्यामुळे लोकांना ०२२-४१११ ४१११ हा क्रिटिकल इमर्जन्सी नंबर लक्षात ठेवणे सोपे झाले आहे. या उपक्रमाच्या शुभारंभाबद्दल बोलताना फोर्टिस हॉस्पिटल्स महाराष्ट्रच्या बिझनेस हेड डॉ. एस. नारायणी म्हणाल्या, '#FirstCallFortis मोहिमेच्या माध्यमातून आम्ही केवळ बृहन्मुंबईतील सर्वात मोठे आपत्कालिन-सज्ज हेल्थकेअर नेटवर्क म्हणून आपल्या क्षमता लोकांसमोर आणत नसून, वैद्यकीय आणीबाणीच्या वेळी एका सहज लक्षात राहण्याजोग्या फोन क्रमांकाचा वापर करून आमच्यापर्यंत पोहोचण्यामधील सुलभता वाढवत आहोत. एमएमआर प्रांतामधील चार अद्ययावत हॉस्पिटल्सचे विस्तृत जाळे असल्याने आम्ही सर्व प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीला हाताळण्यासाठी सज्ज आहोत व यापुढे ०२२-४१११ ४१११ हा नंबर सर्व मुंबईकरांच्या स्पीडडायलवर असेल अशी या एकात्मिक मोहिमेची आशा आहे.' अनेक रितीने विस्तारलेली ही मोहीम राबविण्याच्या एकात्मिक कार्यपद्धतीचे लक्ष्य ७ एप्रिल २०२५ रोजी येणाऱ्या जागतिक आरोग्य दिनापर्यंत १० लाखांहून अधिक घरांपर्यंत आपली माहिती पोहोचवण्याचे आहे.

आपत्कालीन स्थितीसाठी तयार राहण्याचा महत्त्वाचा संदेश प्रसारित करण्यावर या मोहिमेचा भर असणार असून सदैव सुसज्ज राहण्याचे महत्त्व प्रत्येक मुंबईकराला समजावे आणि जिथे प्रत्येक क्षण मोलाचा असतो अशावेळी योग्य क्रमांक त्यांच्या हाताशी असावा याची खबरदारी या मोहिमेद्वारे घेतली जात आहे.